ओळखतो. अशा भक्तांना श्री साईबाबांचे आश्वासन आहे की,
''माझा जो झाला काया वाचा मनी।
तयाचा मी ऋणी सर्वकाळ।
साई म्हणे तोचि झाला धन्य।
झाला जो अनन्य माझ्या पायी॥

पुढे म्हणतात, ''प्रेमाचाची नांदे भक्ति। तेथेच अवघी शांती विरक्ती। तेथेच पाठी निष्ठे युक्ति। निज संपत्ती समवेता॥ (४८/२९) श्री साईबाबा म्हणतात, जो मला शरण आला त्याला शांती, सुख, समाधान विरक्ती लाभणारच. हे माझे वचन आहे. मला तुमचा भाव हवा. अंत:करणात प्रेमभावना नसेल तर भक्तीचा उद्भव होणार नाही. **''प्रेम नुपजे भावावीन। भाव तेथे देव जाण। भावापोटी प्रेम पूर्ण। भावचि कारण भवतरण॥** (४८/३०)

श्री साईबाबांचे चरणी सर्व प्रकारच्या भक्तांना आश्रय आहे. आर्त, जिज्ञासू, मुमुक्षु, अर्थार्थी. त्यांना त्यांच्या भावाप्रमाणे लाभ होतो. भगवान श्रीकृष्ण गीतेत सातव्या अध्यायात अशा भक्तांचे वर्णन करताना सांगतात, 'चार प्रकारचे पुण्यवान लोक माझी भक्ती करतात. दु:खाने ग्रस्त झालेला, जाणण्याची इच्छा करणारा, द्रव्याची इच्छा करणारा आणि ब्रह्मज्ञान प्राप्त झालेला. चौथ्याच्या ठिकाणी काही कर्तव्य उरलेले नसते तो ज्ञानी व तोच खरा भक्त असे समज. इतर तीन भक्तही आपल्या परीने चांगले आहेत व मला ते आवडतात, पण ज्ञानी भक्त मला अधिक प्रिय आहे. कारण हे संपूर्ण विश्व श्री वासुदेव आहे या अनुभवाने त्याचे अंतरंग व्यापलेले असते. तोच श्रेष्ठ भक्त व खरा ज्ञानी. (संदर्भ श्री ज्ञानेश्वरी) श्री साईबाबांच्या भक्तीचे वर्म कळण्यासाठी 'श्री साईसच्चरित्रा'चे पारायण व मनन चिंतन झाले पाहिजे. भक्तीचा हा सोपा मार्ग स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत, ज्ञानी-अज्ञानी सर्वांसाठी खुल्ला आहे. सर्वसामान्य संसारी लोकांना ज्ञानमार्ग कठीण. त्यांच्यासाठी भक्तीमार्ग हाच राजमार्ग आहे. ज्ञानमार्गातील रुक्षता येथे नाही. **श्रीरामकृष्ण परमहंसाचे** बोल आश्वासन देणारे आहेत. ते म्हणतात, **''भक्ती योग, युगधर्म आहे. तो ईश्वराजवळ पोहचण्याचा सोपा मार्ग आहे. ज्ञानयोग, कर्मयोग वा इतर मार्गानेही ईश्वराजवळ जाता येते, नाही असे नाही, पण ते सारे मार्ग कठीण आहेत.** पण ह्याचा अर्थ असा नव्हे की भक्त एका ठिकाणी पोहचेल आणि ज्ञानी आणि कर्मी दुसऱ्या ठिकाणी जातील. ह्याचा अर्थ असा की ज्याला ब्रह्मज्ञान हवे आहे तो भक्तीच्या मार्गाने गेला तरी त्याला ते ब्रह्मज्ञानही लाभेल. भगवान भक्तवत्सल आहे. त्याने केवळ मनात आणल्यासआपल्या भक्ताला तो ब्रह्मज्ञानही देऊ शकतो. भक्त ईश्वराचे साकार रूप बघू इच्छितो आणि त्याच्याशी बोलू इच्छितो, त्याला ब्रह्मज्ञान नको असते, पण ईश्वर इच्छामय आहे. त्याची खुशी असेल तर तो भक्ताला आपल्या अनंत ऐश्वर्याचा अधिकारी बनवितो. त्याला भक्तीही देतो आणि ज्ञानही देतो. भक्ताचे लाड देव किती करतो, तो त्याला किती आवडतो ह्याची सुस्पष्ट कल्पना येते.

श्री साईबाबा हेच सांगताना म्हणतात, **'संत प्राप्तीचे मार्ग दोन। एक भक्ती दुजा ज्ञान। ज्ञानमार्गाचे सायास गहन। भक्तीचे साधन सोपा रे॥** (४१.७१)... **'ऐसी सोपी सुलभ भक्ति। तरीही अवघे ती का न करतीं।** ही खंत त्यांना आहे.

अे/२ - ६०५ हरसिद्ध पार्क,
पवार नगर, ठाणे.

# साधना

सोडून देरे सर्व साधना भज साई एका
पार करील नौका तुमची नको घेऊ शंका ॥धृ॥

नको तुला मंत्र-तंत्र तो
नको यंत्र-परम कठीन तो
अघोर विद्या शांतीभंग तो
एकमात्र ध्यान धरा हो विकल्प घेऊ नका ॥१॥

नको पुजेचे ते अवडंबर
साई स्वये दत्त दिगंबर
जसा शोभला गौरीशंकर
अमृताला दूर सारुनी कांजी सेऊ नका ॥२॥

नको जप तप अनुष्टाने
नको उपास - तापास पारणे
नको जिणे ते कविलवाणे
कर धरुनी चला साईचा तोची पाठिराखा ॥३॥

साई तोची तो मुरलीधर
वाजवी पावा रम्य मनोहर
आहे माया ती क्षणभगुंर
सत्याचा मार्ग सोडूनी कुपंथ चालू नका ॥४॥

साई अपुला तो चतुराननन
'अल्ला मालिक' तोची गजानन
ब्रह्म चैतन्य तोची सनातन
तुमची हृदयी सदा वसे तो, सत्य तोची ऐका ॥५॥

**विश्वनाथ मुरलीधर कुलकर्णी**
मलकापूर


# श्री साईबाबा आणि शिरडीबद्दल काही चुकीच्या समजुती व अपप्रचार

– ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)

— ❖ ❖ ❖ —

**श्री साईबाबांबद्दल काही चुकीच्या गोष्टी महाराष्ट्राबाहेर मराठी न जाणणाऱ्या भक्तांमध्ये पसरलेल्या श्री. निंबाळकर यांना आढळून आल्याने त्याबद्दल स्पष्टीकरण देणारा त्यांचा खास लेख सर्व साईभक्तांनी लक्षपूर्वक वाचून काही गैरसमज आढळल्यास ते दूर करावेत.**

— ❖ ❖ ❖ —



**श्री साईबाबांचे देहत्यागानंतर पुन:प्रकटीकरण :**

मराठी न जाणणाऱ्या आणि विशेषत: दक्षिण भारतात अशी समजूत आहे की श्री साईबाबा कै. काकासाहेब दीक्षितांना एकदा म्हणाले होते की ते आता जातील ते पुन्हा ८ वर्षांनी परत येतील आणि त्याप्रमाणे श्री साईबाबांचे इ.स. १९१८मध्ये निर्वाण झाल्यावर त्यांनी पुन्हा ८ वर्षांनी म्हणजे इ.स. १९२१ साली श्री सत्यसाईरुपाने जन्म घेतला.

परंतु कै. गो. र. दाभोलकर उर्फ हेमाडपंतांच्या श्री साईसचरितात आणि कै. काकासाहेब दीक्षितांनी लिहिलेल्या उपोद्घातात स्पष्ट म्हटले आहे की श्री साईबाबा म्हणाले होते, 'आता आपण जाऊ ते आठ वर्षांचे होऊन येऊ' आणि याला पुष्टी म्हणून द्वापारयुगात श्रीकृष्णमूर्ती देवकी मातेजवळ प्रकटली तेव्हा ८ वर्षांची होती या पुराणातील कथेचा उल्लेख केला आहे.

**आठ वर्षांचा बाळ जनीं ।**
**प्रकट होईन मी मागुतेनी ।**
**ऐसें महाराज भक्तां लागुनी ।**
**आहेत सांगुनी राहिले ॥१३९॥**

**आहे ही संताची वाणी ।**
**वृथा मानूं नये कोणीं ।**
**कृष्णावतारीं चक्रपाणी ।**
**केली करणी ऐसीच ॥१४०॥**

**आठ वर्षांची सुंदर कांति ।**
**चतुर्भुज आयुधें हातीं ।**
**देवकीपुढें बंदीशाळेप्रति ।**
**कृष्णमूर्ति प्रकटली ॥१४१॥**

– अध्याय ४३

**''या लेखकाजवळ महाराजांनी स्वत: एकदा असे उद्गार काढले होते की 'आतां आपण जाऊं ते आठ वर्षांचे होऊन येऊं.' श्रीकृष्णमूर्ति देवकीमातेजवळ प्रकटली तेव्हा आठ वर्षांचीच होती असे पुराणांतरी वर्णन आहे, 'आठा वर्षांची मूर्ती । असंभाव्य पडिली दीप्ति । तेजें दशदिशा उजळती । तेथें लपती शशिसूर्य ॥' (हरिविजय अ. ३, ओ. १२६)''**

– कै. हरि सीताराम दीक्षित. श्री साईसचरित उपोद्घात पृ. २

श्री सत्यसाईबाबांच्या भक्तांचे म्हणणे आहे की, कै. दीक्षितांनी श्री साईबाबांचे वरील बोलणे नीट ऐकले किंवा समजले नसावे. परंतु कै. दीक्षित हे मुंबईतील त्याकाळचे एक नामांकित वकील होते ज्यांना हायकोर्टात प्रतिस्पर्धी वकिलाची

आणि साक्षीदारांची वक्तव्ये काळजीपूर्वक ऐकण्याची आणि समजून घेण्याची सवय होती. तेव्हा त्यांनी श्री साईबाबांचे वरील शब्द ऐकले नसावेत किंवा त्यांना ते नीट समजले नसावेत हा मुद्दा मनाला पटत नाही.

या संदर्भात चेन्नाईचे (मद्रासचे) कै. प. पू. नरसिंहस्वामी ज्यांनी अत्यंत परिश्रमानंतर शोध लावून आणि बाबा हयात असताना त्यांना जवळून भेटलेल्या भक्तांची निवेदने गोळा करुन श्री साईबाबांबद्दल बरेच वाङ्मय प्रसिद्ध केले आहे ते काय म्हणतात पहा :

"Sometimes people come forward and say, 'I am an Avatar of Sai Baba' After investigation it has been noted that any person claiming to be Sai Baba does not show even a very small fraction of Baba's nature. Mere powers to read thought, mere clairvogance, mere production of articles from empty box or hands or more devotion to Sai or God, will not constiture one into Avatar of Sai. So we might condude this chapter by saying that there is no person living who can be recognised by all as having the entire Sai Spirit or soul in his body. That question arises because of the statements of Sai Baba to several of his devotees. When Sri. M. B. Rege, Master Tarkhad and others were requesting Sai to protect them in future lives, Sai Said that he was going to be re-born birth after birth. Kakasaheb Dixit seems to have said 'Baba said that he would appear suddenly as a boy of eight and show himself, that is his powers and nature.' We have not till now discovered any boy of eight, who had Baba's wonderful nature and powers. Even if he should take birth somewhere his Anantaratma Rupa is still there and is still helping. Therefore, the question of our fonding any person who is the Avatar of Baba need not be further discussed."

**- Life of Sai Baba. Vol II P330331**

By H. H. Narasimha Swamigi

येथे मुद्दाम नमूद करावेसे वाटते की, कै. प. पू. नरसिंह स्वामीजी श्री सत्य साईबाबांप्रमाणेच दक्षिण भारताचे रहिवासी होते आणि श्री सत्यसाईबाबा यांनी आपण साईबाबा आहोत हे जाहीर केल्यानंतर (२३ मे १९४०) सोळा वर्षे म्हणजे इ. स. १९५६ पर्यंत जिवंत होते.

### श्री साईबाबांची जन्मपत्रिका

श्री सत्यसाईबाबांनी श्री साईबाबांची निश्चित जन्मतारीख २७ सप्टेंबर १८३८ अशी जाहीर केलेली आहे आणि त्यावरून चेन्नइच्या (मद्रासच्या) श्री. एम. आर. रघुनाथन यांनी त्यांची जन्मपत्रिका बनवून प्रसिद्ध केलेली आहे आणि साईबाबांच्या जन्माबद्दल खालील माहिती सांगितली आहे.

**जन्म दिवस व वेळ :** गुरुवार, दुपारी १२ वाजून १५ मि. ५ से.

**जन्मस्थान :** महाराष्ट्रात औरंगाबाद जिल्हयातील पाथरी गावाजवळील गोदावरी नदीच्या काठावरील अरण्यात.

या गोष्टी खऱ्या असतीलही. परंतु माझ्या मते असल्या संशोधनात वेळ आणि पैसा घालविण्यापेक्षा साईबाबांची शिकवण जाणून घेऊन त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करून आपले कल्याण आणि उद्धार करून घेणे हेच जास्त महत्त्वाचे आहे. झाड किती उंच आहे, ते कोणी लावले आहे, त्यावर किती फळे लागली आहेत या गोष्टींचा तपास करण्यात वेळ आणि श्रम खर्च न करता, त्यावरील गोड फळे खाण्याचा आनंद लुटणेच जास्त श्रेयस्कर नाही का?

### म्हाळसापतींचा पंजाबमध्ये पुनर्जन्म

दिल्लीच्या डॉ. सत्यपाल रुहेला यांनी आपल्या Sri Shirdi Sai Baba - The Universal Master या पुस्तिकेत साईबाबांचे थोर भक्त म्हाळसापती यांचा पंजाबमधील भल्यासिया (Maryasia) गावात रणजित कुमार त्रेहान म्हणून पुनर्जन्म झाल्याची आणि त्यांनी शिरडीतील खंडोबाच्या देवळात म्हाळसापतींची मुर्तीही स्वखर्चाने बसविली असल्याची माहिती दिली आहे.

म्हाळसापती हे साईबाबांचे अगदी जवळचे आणि आवडते भक्त होते. साईबाबा शिरडीत आल्यापासून ते त्यांच्या देहत्यागापर्यंत म्हणजे सतत ६० वर्षे साईबांबांच्या सान्निध्यात वागलेले ते एकमेव भक्त होते. आपला घरसंसार सोडून द्वारकामाईत ते बाबांजवळ झोपत असत. इ. स. १८८६ मध्ये बाबांनी ब्रह्मांडी प्राण चढविला असताना आपल्या मांडीवर बाबांचे डोके धरून बाबांच्या देहाचे सतत तीन दिवस रक्षण केले होते. ते अत्यंत नि:स्वार्थी होते. गरिबी असून पैशाचा लोभ मुळीच नव्हता. त्यांचा मृत्युही एकादशीच्या पवित्र दिवशी झाला होता. कै. प. पू. नरसिंह स्वामी त्यांच्या Life of Sai Baba

Vol II मध्ये म्हाळसापतींबद्दल म्हणतात:

"When Mhalsapati's death was approaching he retained full consiousness and control of his mind. That was on 11th September 1922 Monday (on the month of Bhadrapada, Ekadashi somavara, sacred, to Shiva and Khandoba) Having finished all his puja he said to his family, "To-day is my father's shraddha day. Finish cooking soon. Today I close my earthly life and go to Heaven." So, Laxman the Brahmin came and finished the shraddha at once and finished the gift of balils to crows, cows etc. and guests were fed. Then the family meals were finished Mhalsapathy took betel and nuts after the meal. After chewing a bit, he put on a kupni. Having near him Bala Gurav, Ramachandra Kothe etc., he told them all to do Ramachandra Japa. Japa went on his son was there and he gave him his stick. Mhalsapaty said to his son, "Spend time piously in Uttam Bhakti Marg i.e. in holy devotion. All that I told you will happen." Mhalsapathy uttered the word 'Ram' and breallhoed his last. Thus he passed away in ealm faith and cheerfulness on the 11th Sept. 1922. The death was a fitting termunation to a ture, lofty and dedicated life - a life of love, faith and total surrender - a death that may be envied by many who may not be prepared to adopt the rigorous course that led upto if and ensured if."

म्हाळसापतींचे हे मरण श्रीकृष्ण भगवानांनी गीतेत सांगितल्याप्रमाणे निश्चित मोक्षप्रद नाही का?

**अन्तकालेच मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम् ।**

**या प्रयाति समभ्दांव याति नास्त्त्र संशय: ॥ अ. ८ श्लो. ५ ॥**

(अंतकाळी जो माझेच स्मरण करीत देह सोडितो तो माझ्याच स्वरूपाला पावतो यात संशय नाही)

श्री साई चरित्राच्या अध्याय ३१ मध्ये हेच म्हटले आहे.

**अंतकाळी जे जे ध्यान । ते तेच रूपे पुनर्जनन ।**
**भगवन्पदीं झालिया लीन । जन्मविहीन होई तो ॥७॥**

असे असताना म्हाळसापतींचा आता पंजाबमध्ये पुन्हा जन्म झाला आणि तोही एखादी संसारी व्यक्ती म्हणून हे कसे पटावे? आणि असे घडलेच असेल तर म्हाळसापतींनी मोक्षासाठी आयुष्यभर शिरडीत जे हाल सोसले ते व्यर्थच का ? आणि श्रीकृष्ण भगवानांचे गीतेतील वरील आश्वासन तसेच श्री साईसच्चरित्रातील वरील म्हणणे खोटेच मानावयाचे का?

**शिवम्मा थायी** (Thayee)

डॉ. सत्यपाल रुहेला यांनी आणखी एका पुस्तकात बंगलूर निवासी **शिवम्मा थायी** यांचे चरित्र (My life with Sri Shirdi Sai Baba) १९९२ साली प्रसिद्ध केले आहे. त्याच्या तीन आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या असून परदेशातही बरेच विकले गेले आहेत.

या बाईंचा जन्म तामिळनाडूतील कोइमतूर जिल्ह्यात वेल्लकिनारु (Vellakinaru) गावात १६ मे १८९१ रोजी झाला होता आणि त्यांचा मृत्यू कर्नाटक राज्यात बंगलोर येथे ७ जुलै १९९४ रोजी वयाच्या ११३ व्या वर्षी झाला.

त्यांचे वयाच्या १२ व्या वर्षी लग्न झाले आणि १ वर्षाने त्यांनी एका मुलाला जन्म दिला. त्या १५ वर्षांच्या असताना त्यांचे चुलते, ज्यांनी संन्यास घेतला होता आणि अनेक साधुसंतांना भेटले होते ते एकदा श्री साईबाबांना आपल्या बरोबर घेऊन त्यांच्या गावी आले होते. बाबांचे वय तेव्हा ७०-७१ वर्षांचे असावे. बाबा २ दिवस राहिले होते आणि कोइमतूर व इतर भागातून आलेल्या लोकांना उपदेश करीत होते. अशा एका प्रसंगी या बाईंच्या चुलत्यांनी बाबांना विनंती केली की, येथे आमच्या कुटुंबातील १५ मुले व मुली एकत्र जमलेली आहेत. त्यापैकी कोणा एकाला किंवा एकीला आपण मंत्रोपदेश द्यावा.

साईबाबांनी या बाईंना निवडले आणि जवळ बोलावून तिला गायंत्री मंत्र ऐकवून तो तिच्याकडून म्हणवून घेतला. दुसऱ्या दिवशी तिच्या चुलत्याने तिला विचारले की, तुला काल शिकविलेला मंत्र म्हणता येतो का? तर ती म्हणाली की 'नाही मला आठवत.' त्यावर तिचे चुलते तिला बाबांकडे घेऊन गेले आणि त्यांनी तो मंत्र कागदावर तामीळ भाषेत लिहून दिला आणि तोंडपाठ करण्यास सांगितले. (या बाईंचे शाळेत शिक्षण झालेले नव्हते, परंतु तामीळ भाषा थोडीफार वाचायला घरात त्या शिकल्या होत्या.)

या बाई वयाच्या १७ व्या वर्षी म्हणजे इ.स. १९०८ साली (त्यावेळी साईबाबांचे वय ७३ वर्षांचे होते) प्रथम शिरडीस गेल्या आणि त्यानंतर अनेक वेळा (वर्षातून ३-४ वेळा तरी) शिरडीला बाबाला दर्शनाला गेल्या होत्या. त्यांचे काही अनुभव

खालीलप्रमाणे सांगितलेले आहेत-

१) दर्शनाला आलेल्या भक्तांना बाबा **'अल्ला अच्छा करेगा'** असे म्हणून आशीर्वाद देत असत. परंतु या बाईंना तामीळ भाषेत 'तल्ला ल्रु' म्हणजे 'तुझी सदा भरभराट असो' असा आशीर्वाद देत असत. पुढेही साईबाबा त्यांचेशी नेहमी तामीळ भाषेतच बोलत असत.

२) मशिदीच्या आंगणात पेटलेल्या चुलीवरील उकळणाऱ्या भांड्यातील रस्सा बाबा आपला हात घालून ढवळीत आणि त्यांच्या तोंडावर त्यांचा हात भाजल्याचे मुळीच चिन्ह नसे.

३) त्या वयाच्या २३-२४ व्या वर्षी म्हणजे इ. स. १८१५ साली शिरडीला गेल्या असताना त्यांनी बाबांचा खंडयोग (शरीराची हात, पाय वगैरी अवयवे वेगळी करून इकडे तिकडे फेंकणे) केलेला पाहिला आहे. बाबांनी त्यांना हा खंडयोग शिकविण्याची तयारीही दाखविली होती, परंतु त्यांनी ती नाकारली.

तसेच कधी कधी साईबाबा शिरडी गावाबाहेर असलेल्या एका विहिरीवर आपल्याबरोबर त्यांना घेऊन जात आणि तेथे ते धौतियोग करीत असताना आतडी बाहेर काढून चांगली धुवून ती विहिरीच्या भिंतीवर वाळत घालीत असताना ते त्यांना तिचे गरूड, कावळे वगैरे पक्षांपासून रक्षण करण्यास सांगत असेत.

४) श्री साईसच्चरित्राच्या अध्याय ४७ मध्ये सर्प आणि बेडूक यांच्या तीन जन्मांची साईबाबांनी स्वत: सांगितलेली कथा आलेली आहे. या बाईंचे म्हणणे की, शिरडीत ज्या ठिकाणी बाबांनी ही कथा एका वाटसरूला सांगितली होती त्यावेळी त्या बाबांच्या जवळ हजर होत्या.

५) साईबाबांनी द्वारकामाईत पणत्यात पाणी घालून त्या रात्रभर पेटवून दाखविल्याचा चमत्कार केला तो या बाईंनी स्वत: डोळ्यांनी पाहिला होता.

या सर्व चमत्कारांचे वर्णन श्री साईसच्चरित्रात आलेले आहे. बाबांच्या या सर्वच्या सर्व चमत्कारांच्या वेळी त्या बाई कशा अचूक हजर होत्या आणि तेही शिरडीपासून शेकडो मैल दूर तामीळनाडूत एका खेड्यात किंवा कर्नाटकात बंगलोर येथे राहत असताना याचे मोठे आश्चर्य वाटते. त्यांचे म्हणणे की, इ.स. १९०८ वयाच्या १७ व्या वर्षी त्या प्रथम आपल्या नवऱ्याबरोबर शिरडीला गेल्या. परंतु त्यानंतर त्यांच्या नवऱ्याला शिरडीला जाण्याची उत्सुकता नसल्याने त्या एकट्याच वर्षातून ३-४ वेळा शिरडीला जात असत. एका खेड्यातील अशिक्षित तरुणीने परप्रांतात इतके दूर एकटीने वारंवार प्रवास करू शकणे हे आश्चर्यकारक तर खरेच, पण ते खरे असलेच तरी या बाईंबद्दल कोणाही शिरडीकराच्या किंवा साईभक्तांच्या बोलण्यात किंवा लेखात या बाईंचा उल्लेख कधीच कोठे कसा आलेला नाही?

खंडयोग किंवा धौतियोग यांच्याबद्दल बोलायचे झाले तर बाबा हे तरुण वयात करीत असत. या बाईंनी बाबांचे हे योग इ.स. १९१५ साली पाहिल्याचे सांगतात. ज्यावेळी बाबांचे वय ७६-७७ वर्षांचे होते. या वयात बाबांची इतकी प्रसिद्धी झाली होती आणि रोज भक्तांची गर्दी इतकी वाढली होती की, बाबांना लेंडीबागेच्या फेरीशिवाय कोठे एकांतात जाताच येत नव्हते. दुसरे म्हणजे या २३-२४ वर्षांच्या तरुणीला आपल्याबरोबर शिरडीबाहेर एकांतात योग करताना घेऊन गेल्याचेही पटत नाही. बाबा कोणाही स्त्रीला द्वारकामाईतही किंवा चावडीत एकटीला येऊ देत नसत. राधाकृष्णाबाईसारख्या तरुण आणि सुंदर विधवेला तिची आपल्याबद्दल अनन्य भक्ती असूनही बाबांनी आपल्या समोर तिला कधी येऊ दिले नाही. असो.

या बाईंना खंडयोग शिकविण्याबद्दल तसेच संस्कृत भाषेतील गायत्रीमंत्र सांगण्याबद्दल तर बोलणेच नको. श्री साईसच्चरित्रात म्हटले आहे :-

**कोणा न सांगे आसन। प्राणापान का इंद्रियदमन।**
**मंत्र तंत्र वा यंत्र-भजन। फुंकणे कान तेही ना॥**

अ. १० ओ. ११३॥

अध्याय १७ व १८ मध्ये संगमनेरच्या राधाबाई देशमुखीणीची गोष्ट आपणाला माहितच आहे.

द्वारकामाईत बाबांनी पाण्याने पणत्या पेटविल्याबद्दल विचार केला तर हा चमत्कार बाबांच्या चमत्कारातील सर्वप्रथम मोठा चमत्कार आहे. Sai Baba of Shirdi - a unique Saint या श्री. एम. व्ही. कामत आणि श्री. व्ही. बी. खेर यांनी लिहिलेल्या पुस्तकात हा चमत्कार इ.स. १८९२ साली घडल्याचे म्हटले आहे आणि या बाई तर शिरडीत प्रथम इ. स. १९०८ सालीच गेल्या होत्या. तेव्हा हा चमत्कार त्यांनी स्वत: डोळ्यांनी कसा पाहिला असेल?

### तात्पर्य

वरील उदाहरणांवरून वाचकांच्या लक्ष्यात येईल की, साईबाबांविषयी महाराष्ट्राबाहेर किती चुकीची माहिती पसरलेली आहे आणि अपप्रचारही झालेला आहे. श्री साईबाबांची मंदिरे बांधली की खूप पैसा गोळा होतो म्हणून

काही व्यक्ती आणि संस्था ठिकठिकाणी मंदिरे बांधीत आहेत. अनेक लोक आपणाला साईबाबा प्रसन्न आहेत, आपल्याशी ते बोलतात असे सांगून भोळ्या भक्तांना आपल्या नादी लावीत आहेत. सर्वांनाच शिरडीला सारखे सारखे जाता येत नाही तेव्हा साईबाबांची मूर्ती ठेवून मंदिरे बांधणे ठीक आहे. परंतु काही ठिकाणी बाबांच्या मूर्तीपुढे त्यांची समाधीही दर्शवितात हे ठीक नाही. कारण साईबाबांची समाधी (ज्यात त्यांचा देह आहे) फक्त शिरडीतच असू शकते. तसेच अलीकडे आंध्रप्रदेशात हैद्राबादजवळ प्रति शिरडीच (समाधीमंदिर, द्वारकामाई, गुरुस्थान यांच्या हुबेहुब प्रतिकृतींसह) उभारण्यात येत आहे. परंतु या शिरडीतील वास्तू ज्यात बाबा देहाने वावरलेले होते किंवा जेथे त्यांचा देह ठेवलेला आहे त्यांची सर त्या वास्तूंची प्रतिकृती बांधून कशी येणार? परंतु भोळे भक्त फसतात आणि शिरडीला न जाता याच वास्तू बाबांच्याच आहेत असे समजून आपली भक्ती व दक्षिणा अर्पण करतात.

या सर्व गोष्टींना कारण म्हणजे या भक्तांना श्री साईबाबांबद्दल खरी वस्तुस्थिती सांगण्याचा कोणी प्रयत्नच केलेला नाही. श्री साईबाबांबद्दल अगदी विश्वसनीय आणि खरी माहिती देणारा ग्रंथ म्हणजे कै. गोविंदराव रघुनाथ दाभोलकर उर्फ हेमाडपंत यांनी लिहिलेला मराठी भाषेतील ओवीबद्ध **'श्री साईसच्चरित्र'** परंतु तो प्रसिद्ध होऊन आज ६८ वर्षे लोटली तरी त्याचे बिगर महाराष्ट्रीयनांकरिता शब्दश, इंग्रजी किंवा हिंदीतून भाषांतर झालेले नाही. इ.स. १९४४ साली बेळगावच्या कै. नागेश वासुदेव गुणाजी यांनी त्यावरून इंग्रजीत श्री साईसच्चरित्र प्रसिद्ध केले आहे आणि त्याच्या शिरडी संस्थानने बहुतेक सर्व भारतीय भाषेत अनुवादही प्रसिद्ध केले आहेत. परंतु कै. गुणाजींचे पुस्तक मूळ मराठी पोथींचे साररूपच असल्याने बाबाविषयींच्या काही गोष्टी भक्तांना नीट कळलेल्या नाहीत. उदाहरणार्थ या लेखाच्या सुरुवातीला श्री साईबाबा आपण आता जाऊ ते आठ वर्षांचे होऊन पुन्हा येऊ असे म्हणाल्याच्या ओव्या उध्दृत केलेल्या आहेत. त्याबद्दल कै. गुणाजींच्या इंग्रजी पुस्तकात उल्लेखच नाही. परंतु अलीकडे मात्र श्री सत्य साईबाबांबद्दलच्या प्रचाराला उत्तर म्हणूनच की काय इ.स. १९९१ च्या १५ व्या आवृत्तीपासून पृष्ठ २२६ वर खालील मजकूर अंतर्भूत करण्यात आलेला आहे.

"Some people started remembering the words of Sai Baba. Somebady said that Maharaj (Sai Baba) told his devotees that in time to come, he would appear as a boy of eight years."

परंतु ही सावरासावर १४ आवृत्त्यांनंतर आणि ५० वर्षांनंतर करण्यात आल्याने तिचा फारसा उपयोग होणे शक्य नाही. असो.

श्री साईकृपेने मूळ मराठी ओवीबद्ध श्री साईसच्चरिताचे सोप्या गद्य रुपांतरसविस्तर टिकेसह मजकडून प्रसिद्ध झालेले आहे आणि आता काही लेखक श्री साई सच्चरिताचे इंग्रजीतून आणि हिंदीतूनही शब्दश: अनुवाद प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न करीत आहेत ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. त्यामुळे तरी श्री साईबाबांबद्दल चुकीच्या गोष्टी पसरण्याला आणि अपप्रचाराला आळा बसेल अशी आशा करूया.

'फाईव्हस्टार', बंड गार्डन रोड, पुणे.

ooo

## बाबांचा महिमा

''जीवन काय आहे साई विना
साईच्या या भक्तिविना'' ॥धृ॥

बाबाची ही महिमा सारी
पावन जाहली शिरडी नगरी
अखंड भक्त येई तुज दर्शना ॥१॥

बाबांची ही शिकवण न्यारी
मंत्र जपूया श्रद्धा सबुरी
अन्य कशाची आस ना मना ॥२॥

हिंदू, मुस्लीम शीख ईसाई
सर्वांचा तु एकच साई
सबका मालिक एक करु गर्जना ॥३॥

नाना पंथे नाना धर्म
बाबा सांगतसे त्याचे मर्म
एकतेची नित्य करू उपासन ॥४॥

बाबांची ती कृपा जाहली
चिंता क्लेष ते सर्व पळाली
धन्य जाहलो आज तव वचना ॥५॥

जीवन काय साई विना
साईच्या या भक्तिविना ॥धृ॥

**- चंद्रकांत जगताप**

# ...आणीक निर्वाणी कोण राखे ?

(लेखांक २ रा)

डॉ. अशोक प्रभाकर कामत
प्राध्यापक : प्रमुख संत नामदेव अध्यासन, पुणे



— ❖ ❖ ❖ —

**''विठो आणि तुकोबा यांचे राज्य'' एकाएकी सुरू झाले असे नाही. तुकोबांनी जीवन व्यापारच्या नाना कळा साहिल्या, पाहिल्या आणि मग ते साऱ्या संकटकळावर मात करून म्हणाले, 'जे झाले ते झाले. ते सारे बरेच झाले. कारण ते आले देवाजीच्या मना, तिथे कुणाचे काही चालेना! नव्हे, त्यात आपण संतोषच मानावा. संकटी पावणारा आणि निर्वाणी रक्षिणारा तो एकच असतो. आपण जर त्याचेच आहोत, तर तक्रार त्याच्याबद्दल करायची कशी ?**

**तुकोबांचा संकटकाळ कसा होता, त्याच्याशी ते कसे आनंदाने 'वागले' ते इथे पाहायचे आहे...**

— ❖ ❖ ❖ —

देहूतील बोल्होबा-कनकाईचं घर मुलामाणसांनी भरलेलं होतं. व्यापारधंदा शेतीवाडी सारं चांगलं होतं. पण एकदम सारं पारडं फिरत गेलं. त्याचं काय झालं:.

तुकोबांचा मोठा भाऊ सावजी एकाएकी घरातून निघून गेला. तो का गेला, कुठे गेला, त्याचं पुढं काय झालं कुणाला ठाऊक नाही. बहुधा त्याला संन्याशी व्हावसं वाटलं. खरे म्हणजे संसारातून असे निघून जाणं किंवा संन्यासी होणं हे वारकरी आचारात बसत नाही. ज्ञानदेवादी भावंडांचे वडील एक असे संसार स्वीकारल्यानंतर निघून गेल्याचं उदाहरण मात्र आहे. काहीही असो सावजीच्या परागंदा होण्याचं आईवडिलांना फार दुःख झालं. त्यांनाही संसाराची गोडी वाटेना. त्यांनी तुकोबावर सगळा भार टाकला. त्यावेळी ते होते बारातेरा वर्षांचे. पण त्यांनी घरप्रपंच चांगला सांभाळला. चारपाच वर्ष गेली. आणि दुष्काळ पडला. शेतीभाती संपली. गुरढोरं मेली. व्यापार थांबला. देणं वाढत गेलं. त्यात आईवडिल मृत्यू पावले.

तुकोबा एकाकी झाले. त्यांची बायको रखमाबाई. तिचा मुलगा संतू. तो गेला. तिला दम्याचं दुखणं होतं. ती गेली. दुसरी बायको केली. तिचं माहेरचं नाव आवली. सासरचं नाव जिजाबाई तिच्या घरचं बरं होतं. तिनं तुकोबाचा संसार सावरण्याचा प्रयत्न केला. पण कर्ज खूप झालं. सावकारांचे तगादे आणि सगळ्या बाजूंनी झालेली ओढाताण. यात तुकोबा वैतागले. त्यांनी स्पष्ट नोंदवून ठेवलंय....

**बाप मेला न कळता। नव्हती संसाराची चिंता ॥**
**विठो तुझे माझे राज्य। नाही दुसऱ्याचे काज ॥**
**बाईल मेली मुक्त झाली। देवे माया सोडविली ॥**
**पोर मेले बरे झाले। देवे माये विरहित केले ॥**
**माता मेली मज देखतां। तुका म्हणे हरलो चिंता ॥**

खरे म्हणजे असे अनेकांचे झाले होते. हे वर्णन साऱ्यांच्या दुःखाचे आहे. दुष्काळामुळे सगळ्यांनाच त्रास झाला. माणसं मेली. संसार संपले. व्यापार बुडाला. माणसं कुठे कुठे पसार झाली. निराश होऊन देशोधडीला लागली. कुठे कुठे निघून गेली. तुकोबांनी मात्र गाव सोडला नाही. धीरही सोडला नाही. ते देवाची भक्ती करून मन शांत ठेवू लागले आणि त्याच गावात अखेरपर्यंत त्यांनी संसार केला.

तुकोबांनी केवळ संकटकाळाला तोंडच दिले असे नाही, तर दुःख भोग त्यांनी प्रसन्नतेने स्वीकारले. जे जे विपरीत होते ते योग्यच असे मानले. त्यांचा अभंगच हे दाखवून देतो.

**बरे झाले देवा निघाले दिवाळे।**
**बरी या दुष्काळे पीडा केली ॥**
**अनुतापे तुझे राहिले चिंतन।**
**जाला हा वमन संवसार ॥**
**बरे झाले देवा बाईल कर्कशा।**
**बरी हे दुर्दशा जनांमध्ये ॥**
**बरे झाले जगी पावलो अपमान।**
**बरे गेले धन गुरेढोरे ॥**
**बरे झाले नाही धरिली लोककाज।**
**बरा आलो तुज शरण देवा ॥**

सर्वसामान्य प्रापंचिकावर संकट येतच असतात. त्यातून जे मार्ग काढतात, तेच सुखी समाधानी होतात. तुकाराम महाराजांचा संसार दुःखाकष्टाचा ठरला. त्यांच्या जवळली एकएक व्यक्ती अकाली निघून गेली. व्यापारउद्योगात दिवाळं वाजलं. त्यात दुष्काळाची भर पडली. उरलंसुरलं सारं संपलं. गावात पत नाही उरली. ...**पण आली ती आपत्ती इष्टापत्ती म्हणून स्वीकारून तुकोबा म्हणाले, ''बरे झाले देवा निघाले दिवाळे।''** अनेक प्रकारचे त्रास झाले. त्यामुळेच तर ध्यानीमनी देवाजीनं जागा घेतली. सारा संसार वांतीसारखा वाटला पण देवाजीचा संसार खरा वाटला. **''ठेविले अनंतं तैसेचि राहावे। चित्ती असो द्यावे समाधान।''** असा नित्य प्रसन्नतेचा भाव जागा झाला. सगळीकडे... अगदी वृक्षलतावेलीतही सगेसोयरे भेटू लागले. महाराज रानावनात गेले. पण घर सोडून नाही. निवांतपणा हवा म्हणून! **''अखंड एकांत सेवावा। अभ्यासचि करावा''** यासाठी गेले. 'वृत्ती परब्रह्मी' स्थिर व्हावी म्हणून गेले. 'अभ्यासी' चित्त लागून राहावं याकरिता **'तुका म्हणे मना पाहिजे अंकुश'** या एका निश्चयानं ते विजेनवनात रमले.

मग चिंतनमनन, सद्ग्रंथाचं वाचन - पारायण, हरिनामस्मरण, कथासंकीर्तन, भजन हा त्यांचा नित्याचा क्रम होऊन गेला. सारा जीवनप्रवासच वेगळा झाला. विरक्ती आधी आली ती सांसारिक प्रसंगांमुळे पण त्याकडे पाहण्याची दृष्टी जशी बदलत गेली तशी जीवनाची गोडीच वाढत गेली. दुःखातून सुख आले. कारण दुःखाकडे पाहण्याचा संतसज्जनाचा विशिष्ट दृष्टिकोन!

तुकोबारायांच्या अभंगवाणीत तो दृष्टिकोण सर्वत्र दिसून येतो. इथं प्रपंच परिवारात काय काय वाट्याला आलं त्याची बऱ्याच तपशीलाने नोंद आहे. पण त्यामागं आक्रोश नाही. आकांत नाही. त्यातून मार्ग कसा काढावा याचा एक अनुकरणीय वस्तुपाठ आहे.

तुकोबांनी आपल्या मनाची अशी समजूत काढली. दिवाळ निघालं. दुष्काळानं त्रास झाला. बऱ्याच गोष्टी गेल्या. दुःखामुळे देव आठवला. बरंच झालं. देवाचं नाव घ्यावं आणि यापुढं नवी उभारी ठेवून काम करावं. संकटे काय येतात आणि जातात. त्यांचा बाऊ करून काय उपयोग? बायको रागीट होती. एवढ्या तेवढ्यानं चिडायची. लोक चर्चा करीत. जे होते ते टाळण्यापेक्षा त्याकडे दुर्लक्ष करणे चांगले. आपण आपले काम करीत राहावे. असे तुकोबा समजूतदार होते. शांत होते. विचारी होते. त्यांच्या घरचे मूळचे वातावरण भक्तीचे. साऱ्यांचे वागणे ममतेचे. वारी सारखी साऱ्यांनी एकत्र येऊन करावयाची साधना. त्यात सहभाग म्हणजे उत्तम लोकशिक्षण. संतसज्जनांचा उत्कट सहवास. नीतिमधुर अभंग ऐकावेत. गुणगुणावेत. पाठ करावेत. अशामुळे तुकोबांवर उत्तम संस्कार झालेले होते. म्हणूनच त्यांना असा अभंग सांगता आला...

**''जोडोनिया धन उत्तम व्यवहारे।**
**उदास विचारे वेंच करी ॥''**

चांगले परिश्रम करावेत. कष्टाने पैसे मिळवावेत. आणि त्यांचा खर्च विचारानेच करावा. जो चांगल्या मार्गाने चालतो तो चांगल्या ठिकाणीच पोहोचतो. हा विश्वास हवा. ज्याला अडचणी असतात, त्याला मदत करावी. लोकांची निंदा करू नये. अवतीभवतीच्या स्त्रियांकडे बहिणीच्या भावनेने पाहावे. पशुपक्ष्यांशीदेखील दयाभावाने वागावे. असे केले तर माणसाचा जन्म मिळाल्याचे सार्थक होते.

पण तुकोबांना हे भाग्य सोळाव्या वर्षापर्यंतच लाभले. एकाएकी संकटपरंपरा सुरू झाली. दुष्काळ पडल्यामुळे सारा गावच त्रासला. दिवाळे निघाले आणि धनदौलत गेली. त्यातच मुलगा गेला. पहिली पत्नी गेली. भाऊ आधीच गेलेला. वहिनी गेली. आईवडील गेले. गुरेढोरे मेली. सर्व प्रकारे प्रतिकुलता आली.


आणि तुकोबांच्या जीवनाने याही विपरीततेत एक वेगळेच वळण स्वीकारले. ते पूर्णपणे भक्तीकडे आकृष्ट झाले.

**गावात राहावे कोण्या बळे ॥**

तुकोबांचे पारिवारिक जीवन तर उद्ध्वस्त झालेच, पण त्यांना गावात राहणेही अशक्यप्राय झाले. या दुःस्थितीत हृदय

पिळवटून टाकणारं वर्णन तुकोबा एका अभंगात करतात.

**आता काय खावे कोणीकडे जावे ।**
**गावात रहावे कोण्या बळे ?**
**कोपला पाटील ये गावींच्या लोका ।**
**आता मज भिका कोण घाली ।।**
**आता येणे चवी सांडिली म्हणती ।**
**निवाडा करिती दिवाणात ।।**
**भल्या लोकीयांसी सांगितली मात ।**
**केला माझा घात दुर्बळाचा ।।**
**तुका म्हणे याचा संग नव्हे भला ।**
**शोधीत विठ्ठला जाऊ आता ।।**



अगदी कोवळ्या वयातच तुकाराम महाराजांवर संसारातील अनेक दुःखं कोसळली. कितीतरी संकटं त्यांना सहन करावी लागली. ते म्हणतात-

देवा, आता मी खावं काय? कुणाच्या आधाराला जावं? गावात तरी कसं राहावं? गावचे पुढारी - पाटील माझ्यावर फार रागावलेले. अनेकांचा माझ्यावर कोप. भिक्षा मागायची म्हटली तरी मिळणार नाही. सारेच म्हणतात - याला काही रीतभात आहे? यानं सगळ्यांना ठकवलंय. यावर आता सरकारदरबारी दावाच करायला हवा. याचा निवाडा करून घेतला पाहिजे.

...लौकिक व्यवहारात किती विपरीत घडू शकतं, त्याचं हे उदाहरण म्हणता येईल. तुकोबारायांना घरीदारी कुठेच सोबत उरली नाही. लौकिक व्यवहारात अपयश आलं म्हणून सारेच उलटले. वाईटावरच राहू लागले. मग महाराजांनी मनाला समजावलं... आपल्या भलेपणाचा इथं उपयोग झाला नाही. आपण दुबळेही ठरलो. म्हणूनच तर घात केला लोकांनी. आता यांच्या संगतीपेक्षा संतसज्जनांची संगती धरावी. थेट श्री विठ्ठलाला साकडं घालावं.

''शोधीत विठ्ठला जाऊ आता'' म्हणत तुकाराम महाराज भक्तिसाधनेत रमून गेले. तिथे त्यांच्या दमल्याभागल्या जीवाला विश्रांती मिळाली. मनातली निराशा दूर झाली. लौकिकापेक्षा अलौकिकाचा आनंद अधिक टिकणारा नि महत्त्वाचा हे मनोमन पटलं. जग अन् जगदीश्वर यांची नव्यानं ओळख होऊ लागली. प्रत्येक नवा दिवस नवनवी दृष्टी देऊ लागला. जागृतीचा वाटू लागला.

अनेक नैसर्गिक संकटे जशी आली तशी ती गेली. तुकोबा शांत राहिले. काही संकटे अशी होती की, ती कोण्या दुष्ट माणसांकडून येत असत. अशा संकटांना टाळणे शक्य नव्हते. तुकोबा तीही मानवी स्वभावांची एकेक तऱ्हा निवांतपणे पाहत, सोशीत राहिले.

त्यातूनही त्यांना नित्य नवा दिवस जागृतीचा । असेच म्हणावेसे वाटले.

**।। जळे माझी काया ।।**

तुकाराम महाराजांसारख्या सत्वशील साधु सज्जनांवरही कसे विचित्र प्रसंग गुदरतात. त्यांना जननिंदेला तोंड द्यावे लागते. नाना प्रकारे कटु अनुभवांना सामोरं जावं लागतं. तुकोबारायांचे चरित्रकार सांगतात...

पुण्याजवळचं लोहोगाव हे महाराजांचं आजोळ. इथं ते नेहमी येत. देवळात कीर्तन करीत. अवतीभोवतीचे लोक मोठ्या प्रेमानं येत. त्यांच्या कीर्तनाचा आनंद लुटीत. कुणी एक शिवबा कासार म्हणून होता. तो आपल्या तोऱ्यात असायचा. बुवांची टिंगलटवाळीही करायचा. गेला कधी कीर्तनाला तर त्यासाठीच जायचा. एकदा तो असाच गेला. पण बुवांच्या कीर्तनाचा प्रभाव असा विलक्षण की, शिवबा कासाराचा कायापालट होऊन गेला. तो तुकोबारायांचा भक्तच बनून गेला. पुढं तो नित्य त्यांच्याच सहवासात राहू लागला. यानं शिवबाची बायको संतापली. तिचा अगदी तिळपापड झाला. तिला वाटलं असावं- बुवा कुणी संधिसाधू आहेत. त्यानं आपल्या नवऱ्याला नादी लावलेले दिसते आणि मग त्या रागाच्या भरात ती भलतंच करून गेली. तिनं तुकारामबुवांना घरी सत्काराच्या निमित्तानं बोलावलं नि त्यांच्या अंगावर कढत उकळतं पाणी ओतून दिलं.

या भयानक प्रसंगीही बुवा अविचल राहिले. त्यांनी आपली व्यथावेदना श्री विठ्ठलाला सांगून टाकली... म्हणाले, देवानारायणा, माझं सारं शरीर भाजून निघालं आहे. दाह काही शांत होण्यासारखा नाही. हृदयाचेच तुकडे झालेत. तू आता बसून राहू नकोस. अशावेळी दुसरा कोण मला सांभाळणार? तूच यावेळी उभा राहा येऊन! माझी सहनशक्ती वाढव. देवा पांडुरंगा तू माझी माऊलीच आहेस. अशा निर्वाणीच्या प्रसंगी

एका आईशिवाय दुसऱ्या कोणाला हाक द्यावी?

प्रसंग भयानक होता. तो कोसळला. पण अपार श्रद्धाबळ होतं. देवदयेनं तुकोबा सावरले. पुढे असंही सांगतात, शिवबाच्या बायकोला शासन झालं. तिला असाध्य आजार झाला. बुवांना कळलं तेव्हा बुवांनी तिला शिव्याशाप नाही दिले उलट काही उपाय सुचवून तिला बरंही करायला मदत केली त्यांनी.

संतसज्जनांचं हे असं असतं. ते देवाचा धावा करतात. देवासारखं वागतात. नरनारायण होऊन जातात.

**जळे माझी काया लागला वोणवा।**
**धाव रे केशवा मायबापा॥**
**पेटली सकळ कांति रोमाबळी।**
**नावरे हे होळी दहवा जाले॥**
**फुटोनियां दोन्ही भाग होऊ पाहे।**
**पाहातोसी काय हृदय माझे॥**
**घेऊनि जीवन धावे लवलाही।**
**कवणाचे काही न चले येथे॥**
**तुका म्हणे माझी तू होसी जननी।**
**आणीक निर्वाणी कोण राखे॥**

त्या अफाट संकटाचं असं वर्णन तुकोबांनी का बरे लिहून ठेवले असेल? आपल्या दु:ख प्रसंगांबद्दल सांगून इतर मंडळींची सहानुभूती लाभावी यासाठी? त्या त्यावेळी जे चित्त क्षुब्ध झाले असेल ते शांत व्हावे म्हणून? नव्हे, त्याचे चित्त क्षुब्ध झालेच नाही. त्यांना कुणाकडून सहानुभूतीही नको होती. त्यांना अलौकिकाच्या अद्‌भुत अनुभवाबरोबर लौकिकातील सुखदु:खाचाही आनंदच वाटला असावा. तो प्रसंग कसा देवकृपेने निभावून गेला हे त्यांना सांगायचे होते. त्यातून इतरेजनांची सहनशक्ती वाढावी अशी त्यांची भावना होती.

पुणे विद्यापीठ, खेर वाङ्मय भवन,
संत नामदेव अध्यासन, पुणे.

○○

# कलीयुगात घडलेला अद्भुत चमत्कार

मागे साईलीला अंकात माझे साईलीलेत अनेक लेख आलेले आहेत. सर्व बाबांच्या प्रेमळ मायेनेच, खरोखर बाबांच्या अद्‌भूत लिलेचे ज्ञान होऊच शकत नाही. ''तुम्ही माझ्याजवळ पहा मी तुमच्याकडे पाहतो'' बाबा धन्य आहे तुमचे सामर्थ्य शब्दच सूचत नाही.

कलीयुगात बाबांचे चमत्कार अलौकिक आहे. आम्ही आतापर्यंत जी काही शुन्यातून प्रगती केली ती केवळ बाबांच्याच कृपेने घरातील सर्वांनाच शिरडीची व बाबांची जणू ओढच आहे. आमच्या घरातील सर्व सुख-दु:खाचे तेच जणू घरातील वयोवृद्ध म्हणून तेच आहेत.

२/३ वर्षातील आमची प्रगती म्हणजे जणू चमत्काराची मालिका आहे. औरंगाबादसारख्या मोठ्या शहरात बाबांनी आमच्या मालकीचा व चांगल्या वस्तीतील आमचे घर केले ते बाबांनीच. मनासारखे फर्निचर, परीसर खरोखरच मला आठवते. मी पंधरा वर्षात कधी गाडी चालवली नाही. इतका शिकलेला साधी गाडी याच्याजवळ नाही. मी तब्बल १५ ते १८ वर्षे रिक्षा व पायीच माझा प्लेटींगचा व्यवसाय करत होते. खूप त्रास अडथळे सहन केले, पण बाबा माझ्या सोबत होतेच. मला वाटले नाही की, मी गाडी चालविन. पहा अद्‌भूत चमत्कार माझ्याकडे प्रथम सनी गाडी आली. कधी गाडी न चालवणारा मी सनी चालवू लागलो. सगळेजण आश्चर्यचकीतच झाले. थोडे दिवस जाताच तोच कायनेटीक होंडा पण आली हो... खरोखरच पुढे अजून चमत्कार दुसरा - फोन आला. पुढे रंगीत कलर टी.व्ही. पण बाबांनी जणू माझ्या प्रगतीचा वसाच घेतला हो. डोळ्यात पाणी येते. भरभरून येते. मागचे जुने दिवस आठवतात? बापरे, बाबांनी इतकी कृपा कशी केली? १५ वर्षांपूर्वी आम्ही घेतलेल्या जमीनीपैकी २ एकर जमीन आम्ही कल्पना करीत नाही इतकी किंमत देऊन गेली. लगेच मी मुलगी व मुलगा शिरडीस बाबांना चादर घेऊन गेलो. द्वारकामाईत ११ नारळाचे तोरण बांधून आलो व सर्व आश्चर्याने पाहतच बसलो. खरोखर अद्‌भूत चमत्कार आम्ही कधीच आयुष्यात विसरू शकत नाही. बाबांनी माझी शून्यातून मोठी प्रगती केली.

ओढ लागली शिरडीची. बाबा तुम्ही खरोखरच अद्‌भूत आहत. बाबांशिवाय आम्ही जगूच शकत नाही.

**- प्रमोद रायसोनी**
शांत-गंगा कॉम्पलेक्स, दशमेषनगर, औरंगाबाद.

# रामनवमी उत्सव: साईभक्तांच्या भक्तीचे दिव्यदर्शन

— ❖ ❖ ❖ —

**शिरडी येथे संस्थानवतीने रामनवमी, गुरुपौर्णिमा व श्री साई पुण्यतिथीचा दसरा उत्सव हे तीन उत्सव फार मोठ्या थाटामाटाने साजरे केले जातात. रामनवमी उत्सव खुद्द श्री साईबाबांच्याच संमतीने - कृपेने सुरू झाला. या उत्सवाच्या प्रारंभास चालू वर्षी शंभर वर्षे झालेली आहेत.**

**श्री साईलीलाचे कार्यकारी संपादक विद्याधर ताठे यांनी रामनवमी उत्सवाचे प्रत्यक्ष पाहून भक्तांना - वाचकांना घडविलेले शब्ददर्शन**

— ❖ ❖ ❖ —

श्री क्षेत्र शिरडी! श्री साईबाबांची पुण्यनगरी!! साईभक्तांची पंढरी!!! अशा या पुण्यनगरीमध्ये प्रतिवर्षाप्रमाणेच यंदाचा रामनवमी उत्सव मोठ्या उत्साहाने - आनंदाने - थाटामाटाने साजरा झाला. साईभक्तीच्या नामघोषात सुस्नात झालेला साईभक्तांचा देहभान हरपलेला विराट सागर पाहून नास्तिकाच्या मनालाही ईश्वरभक्तीचा पाझर फुटावा असा तो दिव्य सोहळा. जीवन धन्य करणारा, कृतार्थ करणारा, कृतकृत्य करणारा.

इ.स. १८९७ साली सर्वप्रथम शिरर्डी येथे श्री साईबाबांच्या कृपेने - संमतीने यात्रा - उरुस या रूपात हा उत्सव सुरू झाला. उत्सव रामनवमीच्या वेळी होत आहे हे लक्षात घेऊन त्यावेळी रामजन्मोत्सव साजरा करण्याची कल्पना साईभक्त भीष्म यांनी मांडली आणि **इ.स. १९११ पासून शिरडी येथील उरुस यात्रेला रामनवमी जन्मोत्सव सोहळाचे भव्य -दिव्य स्वरूप प्राप्त झाले.** ही एकूण परंपरा लक्षात घेता **यंदाचे वर्ष हे शिरडीतील यात्रा - उरुस प्रारंभाचे शताब्दी वर्ष होते.** त्यामुळे साईभक्तांमध्ये अधिकच उत्साह दिसून येत होता.

शिरडीत सुरू झालेल्या या उरुस यात्रेबद्दल व पुढे वर्धित झालेल्या रामनवमी जन्मोत्सव सोहळ्याबाबत साईभक्त हेमाडपंत आपल्या साईसच्चरित पोथीत म्हणतात-

झाले गोपाळ गुंडाचे मानस।
यात्रा एक अथवा उरुस।
भरवावा शिरडीग्रामी वर्षास।
होईल उल्हास सर्वास॥ (अ.६ : ४७)

तेव्हापासून बाबाच्या मते।
यात्रा ठरविली रामनवमीते।
व्यवस्था पाहती तात्या कोते।
यात्रा येते अपरंपार॥ (अ. ६:५४)

शके अठराशे तेहतीस साली।
रामनवमी प्रथम झाली।
उरुसापोटी जन्मास आली।
तेथूनि चालली अव्याहत॥ (अ. ६ :

या ओव्यातून शिरडीतील यात्रा व पुढे सुरू झालेला रामजन्मोत्सव यांचे मनोज्ञ दर्शन आपणास घडते.

यंदाच्या रामनवमी उत्सवासाठी मुंबईहून साईभक्तांच्या अनेक दिंड्या पायी चालत शिरडीस आल्या होत्या. 'आळंदी ते पंढरपूर' अशा वारकऱ्यांच्या हजारो दिंड्या पायी प्रतिवर्षी पंढरपूरी आषाढी महायात्रेस जातात या शेकडो वर्षांच्या परंपरेप्रमाणेच साईभक्तांनी १९८१ पासून मुंबई ते शिरडी अशी पायी दिंडी काढण्यास प्रारंभ केला. आता वरचेवर या दिंड्यांची संख्या वाढत आहे. पंढरपुरला येणाऱ्या हजारो दिंड्यांची पंढरपुरातील सर्व व्यवस्था त्या त्या दिंड्यांचे संचालक स्वत: करतात. मंदिर समिती त्यासाठी काहीही व्यवस्था करीत नाही आणि एवढ्या दिंड्यांची व्यवस्था करणे शक्यही नाही. शिरडीस येणाऱ्या साई भक्तांच्या दिंड्यांची उतरण्याची व्यवस्था संस्थानला करावी लागते व त्यामुळे वाढत्या दिंड्यांच्या व्यवस्थेचा फार मोठा ताण संस्थानवर पडत आहे. दिंड्यांतील साईभक्तांची व्यवस्था करण्यातच संस्थान गुंतून

पडत असल्याने इतर भक्तांच्या सोईकडे काहीसे दुर्लक्ष होते. इतर भक्तांना काहीशी दुय्यम वागणूक मिळते अशी अनेक भक्तांची तक्रार आहे. ही तक्रार, ही नाराजी वगळता साईभक्तांनी उत्स्फूर्तपणे सर्व उत्सवात सहभाग घेतला व उत्सव यशस्वी केला. शिरडीस येणाऱ्या पायी दिंड्यांची संख्या जरुर वाढावी, त्याचा आम्हाला आनंदच आहे. पण त्या दिंड्यांनी पंढरपुरच्या दिंड्यांचे अनुकरण करून आपली व्यवस्था आपण स्वत:च करावी. संस्थानवर बोजा टाकू नये असेही काही साईभक्तांनी आपले मत व्यक्त केले.

प्रतिवर्षीप्रमाणे 'प्रथम दिवस', 'मुख्य दिवस' आणि 'सांगता दिन' असा तीन दिवस रामनवमी उत्सव साजरा झाला. दि. १५ एप्रिल रोजी पहाटेच्या काकडा आरतीनंतर श्री बाबांच्या फोटोची - पोथीची व वीण्याची पूजा करण्यात आली. त्यानंतर संस्थानचे अध्यक्ष श्री. द. म. सुकथनकर यांनी वीणा तर विश्वस्त **श्री. प्रकाश वैशंपायन** यांनी पोथी घेतली. विश्वस्त रोहोम व श्री. सोनी यांनी व अन्य सर्व विश्वस्त व साईभक्तांनी बाबांची तसबीर घेतली आणि मिरवणुकीस प्रारंभ झाला. समाधी मंदिरातून मिरवणूक गुरुस्थान येथे आली. तेथे आरती झाली आणि तेथून मिरवणूक द्वारकामाईत गेली. द्वारकामाईत श्री साईसच्चरिताच्या अखंड पारायणाचा पूजाअर्चेने प्रारंभ करण्यात आला. पारायणाचा श्री गणेशा विश्वस्त **श्री. प्रकाश वैशंपायन** यांनी प्रथम अध्याय वाचून केला. दुसरा अध्याय **ॲडव्होकेट श्री. सोपान धोर्डे** यांनी, तिसरा अध्याय **श्रीमती रेखाताई दिघे** यांनी, चवथा अध्याय **श्री. प्रकाश कारखानीस** आणि पाचवा अध्याय **श्री. म. द. जोशी** यांनी वाचला. त्यानंतर पारायणात भाग घेऊ इच्छिणाऱ्या साईभक्तांना आळीपाळीने संधी देण्यात आली. द्वारकामाई मशिदीमध्ये होणारे श्री साईच्चरित पोथीचे अखंड पारायण हे शिरडी येथील उत्सवाचे एक प्रमुख वैशिष्ट असते. या अखंड पारायणात भाग घेऊन अनेक साईभक्त साइकृपेचा शब्दातीत अनुभव घेतात व स्वत:च धन्य धन्य समजतात.

उत्सवाच्या प्रथम दिनी सकाळी ८ वा. संस्थानतर्फे अभिषेक पूजा करण्यात आली. संस्थानचे विश्वस्त **श्री. अशोक खांबेकर** व **श्री. प्रकाश वैशंपायन** यांनी सपत्नीक ही अभिषेक पूजा केली. मध्यान्ही नेहमीप्रमाणेच बाबांची आरती व तिर्थप्रसाद झाला. दुपारी ४ वा. समाधी मंदिरासमोरील मंडपात प्रसिद्ध कीर्तनकार **ह. भ. प. मनुमहाराज कोकलेगावकर** यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. त्यांनी संत गोरोबा कुंभार यांचे श्रोत्यांना दर्शन घडविले. दासगणू महाराजांच्या परंपरेतील कीर्तन सुद्धा शिर्डी येथील उत्सवाचे एक वैशिष्ट आहे. एका उत्सवात स्वत: साईबाबांनी आपला भक्त दासगणू यास नांदेडहून बोलावून घेतले व कीर्तनाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली. तेव्हापासून आजवर दासगणू परंपरेतील ह. भ. प. तुकारामबुवा आजेगावकर आणि ह. भ. प. मनुमहाराज या मान्यवरांनी शिरडी येथे कीर्तन सेवेचे व्रत निष्ठेने चालविलेले आहे. शिरडी येथील उत्सवात झालेली श्री अनंतमहाराज आठवले यांची बहारदार - प्रबोधक कीर्तने आजही अनेक साईभक्तांच्या आठवणीत आहेत. अनेक जुन्या साईभक्तांनी मला त्या आठवणी सांगितल्या. सायंकाळी नेहमीप्रमाणे धुपारती झाली. त्यानंतर निमंत्रित कलाकार नाशिकच्या सौ. विद्या ओक यांचे सुगम गायन झाले. पारायणासाठी द्वारकामाई मशिद रात्रभर उघडी ठेवण्यात आली.

उत्सवातील मुख्य दिवस म्हणजे रामनवमीचा दिवस. काकड आरतीनंतर द्वारकामाई मशिदीतील अखंड पारायणाची समाप्ती करण्यात आली. या दिवसाचे वैशिष्ट म्हणजे शेकडो साईभक्त गोदावरी नदीचे कावडीतून जल आणतात व बाबांच्या समाधीला अभिषेक करतात. कोपरगावहून गोदावरीचे पाणी कावडीतून पायी शिरडीस आणणे व बाबांच्या पादुकावर - समाधीवर अभिषेक करणे हे एक धार्मिक व्रत आहे. असे व्रत करणाराचे करावे तेवढे कौतुक थोडे आहे. अशा सर्व साईभक्तांबद्दल पूर्ण आदर दाखवूनही या विधीमध्ये काही विधायक सूचनांची दखल घेतली जावी असे वाटते. काही भक्त केवळ बाबांचे स्पेशल रांगेतून दर्शन मिळते व नारळ मिळतो म्हणून कसल्याही बाटल्यांमध्ये पाणी आणतात. विशेषत: प्लास्टिकच्या बाटल्यातून पाणी आणले जाऊ नये. कावड याचा अर्थ व त्यातून येणाऱ्या लहान-लहान घागरी - कळशा यातील पाणीच स्वीकारले जावे. तांब्याचा तांब्या वा छोटी घागर - कळशीचा संस्थानने त्यासाठी आग्रह धरावा, नव्हे अशा विधायक गोष्टीचे बंधन घालावे असे अनेक भक्तांना वाटते.

छोटया-छोटया मुली, छोटी मुले प्लास्टिकच्या बाटलीतून पाणी घेऊन कावडीवाल्यांच्या रांगेतून येतात तेव्हा ही गर्दी गोदावरीहून ५ कि.मी. चालत कावडीसमवेत आली असेल तरी का? असा प्रश्न पडतो आणि त्यातूनच श्री साईबाबांचा यथायोग्य पूज्य भाव राहिल अशा काही बंधनाची गरज काही सुज्ञ भक्तांना वाटू लागते. कावड आणणाऱ्या साईभक्तांनी स्वत: होऊनच बाबांचा वंदनीय मान ठेवण्यासाठी प्लास्टीक बाटल्यातून पाणी न्यावयाचे नाही असे ठरवावे व सर्वांना समाधीवर पाणी घालण्यासाठी तांब्याचा - ताब्या - कलश वापरण्याची स्वयंशिस्त घालावी. यंदाच्या उत्सवात कावडीचा अभिषेक सुरू असताना सर्व विश्वस्तांनी मिळून विष्णुसहस्त्रांना अखंडपाठ केले. नंतर मा. अध्यक्ष

**श्री. सुकथनकर** व विश्वस्त **श्री. रोहोम** यांनी सपत्नीक संस्थानतर्फे पाद्यपूजा केली.

रामनवमीच्या दिनी दुपारी १० ते १२ समाधी मंदिरापुढे होणारे रामजन्मोत्सवाचे कीर्तन हे या उत्सवातील भक्तांचे प्रमुख आकर्षक असते. श्री मनुमहाराज यांनी यंदाचे कीर्तन केले.

**चैत्र शुद्ध नवमी तिथी**
**दोन प्रहरी का ग शिरी**
**सूर्य थांबला ।**
**राम जन्मला ग सखी राम जन्मला ।**

सूर्य माथ्यावर येताच दुपारी १२ वाजता रामजन्माचा गुलाल उधळला गेला. त्यानंतर बाबांची मध्यान्ह आरती झाली. सर्वांना महाप्रसाद वाटण्यात आला.

उत्सवाच्या मुख्य दिनी निघणारी निशाणांची मिरवणूक व श्रींच्या रथाची नगरप्रदक्षिणा हे कार्यक्रम प्रमुख असतात. नेहमीप्रमाणे एक निशान नानासाहेब निमोणकर यांच्या तर दुसरे निशाण दामू अण्णा रासणे यांच्या वंशजांनी मिरवत आणले व द्वारकामाईच्या कळसास बांधले. श्रीच्या रथाची मिरवणूक थाटामाटाने नगरप्रदशक्षिणा करून आल्यावर संध्याकाळची धूपारती झाली.

रामनवमीनिमित्त बाबांचे समाधीमंदिर रात्रभर उघडे ठेवण्यात आले. एकीकडे भक्तांची दर्शनाची रांग लागली होती. या रात्री हजारो साईभक्तांनी साईंचे दर्शन घेतले तर शेकडो कलाकारांनी बाबांपुढे आपली सेवा सादर केली. (त्या कलाकारांची यादी सोबत दिलेली आहे) या कलाकारांमध्ये लक्ष्मीकांत प्यारेलाल सारखे ख्यातकीर्त कलावंत होते. तसेच अगदी नवखे कलाकारसुद्धा होते.

उत्सवाच्या सांगता दिनी दि. १५ एप्रिल रोजी नेहमीप्रमाणे काकडआरती नसते, कारण आदल्या दिवशी मंदिर रात्रभर उघडे असते. या दिवसाचे वैशिष्टचे म्हणजे गुरुस्थानी होणारा रुद्राभिषेक. विश्वस्त **श्री. जयकर व श्री. सोनी** यांच्या हस्ते हा रुद्राभिषेक झाला.

सकाळी १० ते १२ श्री मनुमहाराज यांचे गोपाळकाल्याचे कीर्तन व दहीहंडी कार्यक्रम झाला. काला हा श्रीकृष्णाने संस्थापित केलेला समुहभक्तीचा एक सोहळा आहे. पंढरीच्या वारकऱ्यांचे सर्व धार्मिक सप्ताह व वारी यांची सांगता गोपाळकाल्यानेच होते.

**'तुका म्हणे काला वैकुंठी दुर्लभ'**

ही जगद्गुरु संत तुकोबाची अभंगवाणी आपणास काल्याचे नेमके महत्व सांगते. वारकरी परंपरेतूनच गोपाळकाला (कीर्तन) शिरडीच्या उत्सवात दाखल झालेला आहे असे दिसते.

काल्याच्या कीर्तनानंतर माध्यान्ह आरती व तीर्थप्रसाद कार्यक्रम झाला. रात्री निमंत्रित कलाकाराचा कार्यक्रम झाला. गुरुवार असल्याने श्रींचे पालखीची मिरवणूक निघाली. रात्री शेजारतीने उत्सवाची सांगता झाली. उत्सवात ज्या निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम झाले त्यामध्ये सौ. विद्या ओक यांच्याप्रमाणेच संगीतकार अनिल मोहिले व ठाण्याचे श्री. भिसे यांचाही कार्यक्रम झाला, तसेच शेगावचे गजानन महाराज हे नाटकही झाले.

संस्थानचे अध्यक्ष श्री. सुकथनकर, विश्वस्त सर्वश्री मोहन जयकर, रमेश सोनी, प्रकाश कारखानीस, म. द. जोशी, रामभान चिने, राजीव रोहोम, अशोक खांबेकर, संभाजी काळे, रामचंद्र गोसावी, सोपान धोर्डे, श्रीमती रेखा दिघे, सौ. प्रेमाबाई बज आणि संस्थानचे प्रशासन अधिकारी श्री. एच. व्ही. देशमुख व श्री. एस. के. जगताप आणि सेवक वर्गांनी रामनवमी उत्सव यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. त्यामुळेच कोणत्याही विशेष तक्रारीविना सर्व उत्सव आनंदात संपन्न झाला.

## 'श्री साईलीला'च्या रामनवमी विशेषांकाचे प्रकाशन

श्री साईबाबा संस्थान शिरडीच्या वतीने चालविल्या जात असलेल्या **'श्री साईलीला'** या अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण केलेल्या नियतकालिकाच्या रामनवमी विशेषांकाचे प्रकाशन या उत्सवात करण्यात आले. संस्थानचे अध्यक्ष द. म. सुकथनकर यांनी श्री साईलीलाच्या रामनवमी विशेषांकाचे बाबांच्या चरणी समर्पण करून प्रकाशन केले. तसेच संस्थानतर्फे काढण्यात आलेल्या श्री विष्णुसहस्त्रनाम पोथीचेही यावेळी प्रकाशन झाले.

**श्री रामनवमी उत्सवाच्या मुख्य दिवशी (दि. १६-४-९७) रोजी हजेरी दिलेल्या कलाकारांची यादी**

श्री. राम दीक्षित, ठाणे
सौ. सुनिता वाळके, ठाणे
सौ. अर्चना दामले, ठाणे
श्री. सुभाष आलेगावकर, ठाणे
श्री. बल्लाळेश्वर निमकर, ठाणे
श्री. विकास फडके, ठाणे
श्री. गौतम नाईक, ठाणे

श्री. सुभाष चौव्हन, ठाणे
श्री. प्रफुल्ल आठवले, ठाणे
सौ. दीक्षित, ठाणे
श्री. लक्ष्मीकांत प्यारेलाल, मुंबई
श्री. अफजाल साबरी ब्रदर्स, मुंबई
श्री. एकबाल साबरी ब्रदर्स, मुंबई
सौ. प्यारेलाल, मुंबई
सौ. सविता गिजरे, शिरडी
श्री. पी. आर. जाधव, कोपरगाव
श्री. इरफान शेख, कोपरगाव
श्रीमती गोखलेताई, कोपरगाव
श्री. हरकचंद रुनवाल, आलेगाव
श्री. रघुनाथ सांडभोर, पुणे
श्री. एस. एज्ञ. तिवारी, दिल्ली
श्री. संतोष शेंदुर्णीकर, कोपरगाव
श्री. भोलानाथ समेळ, मुंबई
श्री. एस. एम. यादव, शिरडी
श्री. अर्जुन सरवणकर, मुंबई
कु. अनिता सरवणकर, मुंबई
श्री. पारस पोरवाल, शिरडी
श्री. श्रीराम सातर्डेकर, मुंबई
श्री. भरत विसपुते, शिरडी
श्री. श्रीवास्तव जितेंद्र, दिल्ली
श्री. राजेश खन्ना, दिल्ली
श्री. संतोष रामचंद्र मेस्त्री, दिल्ली
श्री. दत्तात्रय पाटकर, मुंबई
श्रीमती कैसल्याबाई चोपडा, शिरडी
सौ. छबुबाई हेगडे, डोन्हाळा
श्री. कैलास सुकदेव जाधव, नाशिकरोड
श्री. श्रीपतराव जाधव, लोणावळा
सौ. कमलबाई हेगडे, डोन्हाळा
श्री. रघुनाथ हेगडे, डोन्हाळा
श्री. सोपान जगताप, शिरडी
श्री. प्रकाश गोसावी, शिरडी
श्री. वेणूनाथ पा. गोंदकर, शिरडी
श्रीमती परिगाबाई गढवे, शिरडी
श्री. डी. जे. थोरात, शिरडी
श्री. विनायक माळी, शिरडी
श्री. श्री सखाराम नेहे, निमगांव
श्री. नितीन मिराणी, शिरडी
श्री. तुकाराम आरोटे, औरंगाबाद
श्री. ज्ञानेश्वर वैद्य, शिरडी
श्री. लक्ष्मण दादा तुरकणे, पिंपळवाडी
श्री. अशोक गुंजाळ, शिरडी
श्री. मंगलनाथ बाबा, शिरडी
श्री. अतांबर शिरढोणाकर, सांगली
श्री. विलास जाधव, यवतमाळ
श्री. दौलत खिल्लारे, पळसमंडळ
श्री. तुकाराम जाधव, पुणे
श्री. मधुकर लोंढे, पुणे
श्री. राजधिर साळुंके, पुणे
श्री. विष्णु दयाळबाबा, शिरडी
श्री. बालमभाई सय्यद, राहाता
श्री. मेहबुब ब्रास बॅन्ड, राहाता
श्री. राजेंद्र राणे, मुंबई
श्रीमती नारा जोशी, इलाहाबाद
कु. सोनाली कुलकर्णी, औरंगाबाद
श्री. सुधाकर शेळके, साखरवाडी
श्री. मकरंद उपासणी, साखरवाडी
श्री. रत्नाकर कोराटे, शिरडी
श्री. नानासाहेब कोराटे, शिरडी
श्री. आनंत पांचाळ, संगमनेर
श्री. गोपाल कृष्ण, बेंगलोर
श्री. दत्ताराम मुळे, मुंबई
श्री. मधुकर ग. सुर्यवंशी, शिरडी
श्री. प्राणेश कुलकर्णी, शिरडी
श्री. सखाराम गुरव, कोपरगाव
श्री. रामकृष्ण गुरव, कोपरगांव
श्री. रमेश रामखानी, जबलपूर
श्री. वसंतराव गाडेकर, निमगाव
आडलो भो. गाडेकर, निमगाव
श्री. हर्षद पाराशर, नाशिक
श्री. महेश मुळगावकर, मुंबई
श्री. नटवर विसपुते, शिरडी

OO

## शिरडी वृत्त

### सौ. घुगे यांच्या ग्रंथाचे प्रकाशन



ईश्वरस्वरूप मानवी जीवन (पूर्णवादी दृष्टिकोन) ग्रंथाचे प्रकाशन करताना संस्थानचे अध्यक्ष श्री. द. म. सुकथनकर, लेखिका सौ. घुगे आणि मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. वि. बा. घुगे.

ह.भ.प. डॉ. रामचंद्र महाराज पारनेरकर यांच्या शिष्या सौ. मीना वि. घुगे यांच्या **'ईश्वरस्वरूप मानवी जीवन : पूर्णवादी दृष्टिकोन'** या ग्रंथाचे रामनवमी उत्सवात, संस्थानचे अध्यक्ष श्री. द. म. सुकथनकर यांच्या शुभहस्ते झाले.

साई निवासमधील सभागृहात झालेल्या या प्रकाशन समारंभास संस्थानचे अनेक विश्वस्त आणि सौ. घुगे यांचे आप्तेष्ट हितचिंतक उपस्थित होते. या कार्यक्रमात डॉ. वि. बा. घुले, विश्वस्त श्री. म. द. जोशी यांची भाषणे झाली. सौ. घुगे यांनी ग्रंथलेखनाची पार्श्वभूमी सांगून ग्रंथाची थोडक्यात ओळख करून दिली.

आपला संसार व अन्य जबाबदाऱ्या संभाळून लेखिकेने केलेल्या अध्यात्मिक चिंतनपर ग्रंथलेखनाबद्दल संस्थानचे अध्यक्ष श्री. सुकथनकर यांनी लेखिकेचे कौतुक केले व त्यांच्या हातून भविष्यात असेच उत्तमोत्तम ग्रंथ लेखन व्हावे अशा शुभेच्छा दिल्या. (ग्रंथ परिचयात्मक लेख पुढील अंकात.)

# साई अनुभव

# हे मला सांगितलच पाहिजे

८ डिसेंबर १९९६ या दिवशी दुपारी जेवताना माझी २७ वर्षांची विवाहित मुलगी, जिला एक दोन वर्षांची गोड मुलगी आहे, ती म्हणाली की, घास गिळल्यानंतर घशातून सुमारे एक फूट अंतरावर अडकल्यासारखा होतो. एक घास अन्ननलिकेतून खाली जायला जवळजवळ १-१॥ तास लागला. अर्थात्‌त दुसरे दिवशी ९ डिसेंबरला ती फॅमिली डॉक्टरकडे गेली. त्यांनी तिला बेरियम एक्सरे काढायला सांगितला. बेरियम एक्सरे १० डिसेंबरला काढून त्याचे रिपोर्टस घेऊन ती पुन्हा फॅमिली डॉक्टरकडे गेली. तिच्या अन्ननलिकेला आतून सूज आली होती. निरुपद्रवी ट्यूमर असल्याचे रिपोर्टमध्ये लिहिले होते. एन्डोस्कोपी करण्याचा सल्ला दिला गेला. त्याप्रमाणे एका नावाजलेल्या तज्ज्ञ डॉक्टरांकडे आम्ही मुलीला नेले. तिच्या एन्डोस्कोपीवरून असे कळले की, तो 'लम्प' अथवा ट्यूमर सर्जरीने काढावा लागेल. ट्यूमर काढणे सोपे असेलही, परंतु अन्ननलिकेपर्यंत जाण्यासाठी महत्वाची इंद्रिये विचारात घेता ऑपरेशन खूपच धोकादायक आणि गुंतागुंतीचे हेते. (हे मला नंतर सांगण्यात आले) डॉक्टरांनी ६ जानेवारी ९७ ला मुलीला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करायला सांगितले. ८ जानेवारीला ऑपरेशन करण्याचे ठरले होते. तत्पूर्वी त्या ट्यूमरची नक्की लोकेशन वगैरे बघण्यासाठी पुन्हा एकदा एन्डोस्कोपी करून टी.व्ही. व्हिडिओ कॅसेट काढायचे ठरले.

११ डिसेंबर ९६ ला आम्ही आमच्या स्नेही डॉक्टरांकडे तिचे रिपोर्टस् दाखवायला नेले. ते म्हणाले, 'घाबरू नका. धोकादायक वाढ नाही. तरीही तो काढणं आवश्यक आहे. तेव्हा या निष्णात डॉक्टरांना भेटा. वेळ दुपारची होती. आम्ही घरी यायला निघालो. मी एकदम माझ्या मुलीला म्हटलं, ''प्रज्ञा, गाडीतून उतर, हे बघ हे साईंचं मंदिर आलं. (दादर टी.टी.चं शिरडी संस्थानचं.) तू दर्शन घे. मला तीन मजले चढायला वेळ लागेल.'' मुलगी पटकन उतरली. साई माऊलीचं दर्शन घेतलं. गुरुवारी १२ तारखेला एन्डोस्कोपीसाठी रिकाम्या पोटी मुलगी गेली. पण डॉक्टर म्हणाले, ''आज नको. उद्या या.'' माझ्या मनासारखं घडलं. गुरुवारी ४-४॥ च्या सुमारास मी साईबाबांच्या दर्शनाला दादर टी.टी.च्या मंदिरात गेले. साईंचं दर्शन घेतलं. त्यांची आळवणी केली. माझं मन त्यांना कळलं. मला त्यांचा फुलाच्या रुपात अनुग्रह मिळाला. मन शांत झालं. त्यानंतर इतके दिवस शिरडीला जाईन चाललं होतं ते प्रत्यक्षात घडलं. साईंनी आम्हाला अलगद शिरडीला नेऊन आणलं. (२१-२२ डिसें.) ठरल्याप्रमाणे घरातून हसतहसत माझी मुलगी ऑपरेशन करून घ्यायला निघाली. तिला आता कसलाच त्रास नव्हता. परंतु तो ट्यूमर काढायला तर हवा होता. त्यापूर्वी माझी मुलगी एका गुरुवारी मंदिरात गेली तेव्हा मी तिला साईंची पोथी आणायला सांगितलं. यापूर्वी एका मैत्रिणीने मला पोथी वाचायची सूचना केली होती. पण बुद्धि झाली नाही. मुलगी हॉस्पिटलला जायच्या आधीपासून माझं पोथीवाचन सुरू झालं. सोमवारी पोथी वाचता वाचता मी साईबाबांची करुणा भाकली. कळवळ्याने त्यांची आठवण काढली. दुपारी माझे यजमान हॉस्पिटलमधून घरी आले. ऑपरेशनच्या आधीच्या टेस्ट्स चालू आहेत म्हणाले. माझ्या साई माऊलीची आठवण करत, नामस्मरण करत मी शांत राहिले. रात्री मुलीचा फोन आला, ''बहुधा ऑपरेशन नाही.'' मंगळवारी मी पोथी वाचली की नाही आठवत नाही, पण नामस्मरण करत होते. मंगळवारी दुपारी मुलीचा फोन आला, ऑपरेशनची अजिबात जरुर नाही. अन्ननलिकेत दिसणारी सूज टी.व्ही. व्हिडिओ कॅसेटमध्ये दिसतच नाही. गोळ्या बिळ्या देतील.'' बुधवारी जिचं मेजर ऑपरेशन होणार होतं ती माझी मुलगी सकाळी घरी आली. हसतहसत गेली होती. हसतहसतच व्यवस्थितपणे घरी आली. काही महिने औषधोपचार चालू राहतील एवढंच.

साईबाबांची उदी जिभेवर ठेवून मी केलेली आळवणी की माझ्या मुलीची भक्ति काहीही असेल, पण ऑपरेशन टळलं. साईबाबांच्या दिव्य शक्तिने जे होतं ते नाहीसं झालं. माझ्यासारख्या सामान्य, सर्व विकारांनी युक्त अशा गृहिणीवर साईबाबांनी कृपेचं छत्र धरलं. ऑपरेशन होणार नाही असं तीन वेळा मला सूचित केलं. शिरडीच्या साईबाबांच्या मंदिरातील पुजाऱ्याच्या मुखातून 'फक्त श्रद्धा हवी' असं सांगून मला

आत्मबळ, भक्ति आणि श्रद्धा वाढवण्याचा उपदेश केला. तेव्हा विज्ञानाच्या या युगात दैवी शक्तीवर विश्वास ठेवायलाच पाहिजे हे साईबाबांनी मला दाखवून दिलं आहे. जो जो अंत:प्रेरणेने, खऱ्याखुऱ्या भक्तीने कळवळ्याने साईबाबांची आठवण करील, आपल्या श्रद्धेने त्यांना जावळ ओढेल, आपल्या प्रेमाच्या अश्रुंनी त्यांचं रुप मन:श्चक्षुंपुढे पाहील, त्यांचं नावं होईल, श्रद्धेने उदी लावेल, त्याला त्याला अशीच प्रचीती येईल हे मी खात्रीपूर्वक सांगते. या विश्वावर नियंत्रण करणारी परमेश्वरी शाक्ति मला साईरुपात दिसते. त्यांच्यावर अढळ विश्वास ठेवून मी त्यांची करुणा भाकली. मुलीवरचं संकट जाण्यासाठी त्यांना शरण गेले. **'शरण मज आला आणि वाया गेला दाखवा दाखवा ऐसा कोणी'** या वचनाची मला प्रचीती आली. साईंची महती मला सर्वांना सांगितलीच पाहिजे. या साईमाऊलीला विसरू नका. साईंना आपल्याकडून काय हवं? धन? दौलत? सोनं? रुपं? नाही. **त्यांना हवी फक्त काळजातली भक्ती! श्रद्धा! बस!** दुसरं काही नको. हे माझे अनुभवाचे बोल आहेत. ज्ञान-विज्ञानावर नियंत्रण करणाऱ्या शक्तीला आपल्याकडून प्रेम हवं. त्याचं नाव घ्यावं, त्यांची आठवण ठेवावी आणि आपण भयमुक्त, ताणमुक्त आयुष्य जगावं, आपल्या भक्तांसाठी साईबाबा धावून येतात हा मला आलेला अनुभव इतरांना कळावा, साईचरणी इतरांनीही लीन व्हावं, सोन्यासारखा मिळालेला हा मनुष्यजन्म सार्थकी लावावा, जे जे मला प्रचीतीला आलं ते सांगणं मला माझ्यासारख्याच भक्तांच्या दृष्टिने हिताचं वाटलं, या भक्तीमार्गावरुन जाताना होणारा आनंद शब्दातीत आहे. अद्वैताचा अनुभव घेतल्याशिवाय कळणार नाही. साईच्या नावातली शक्ती, त्यांच्या दर्शनातून होणारी प्रचीती, त्यांचा दयाळू, क्षमाशील वृत्तीचा अनुभव हे सगळं सगळं जो जो प्रत्यक्षात अनुभवेल त्याला साईमाऊलीच्या कृपेची महती कळेल आणि नंतर फक्त साईबाबांच्या नावाचा आणि दर्शनाचाच ध्यास लागेल. गुरु आणि शिष्य यांच्यातलं द्वैत दूर होऊन साकार झालेली एकरुपता, अद्वैत याच्यातली मधुरता, गोडी चाखता येईल. शबरीच्या उष्टया बोरांवर राम का भाळला हे कोडं उलगडलेलं अढळ, अविचल निष्ठा, भक्ति, श्रद्धा मनात ठेवून या साईबाबांच्या चरणी नम्रपणे प्रार्थना करावी यातच आपलं हित आहे. **'जया मनी जैसा भाव, तया तैसा अनुभव'** हेच शेवटी अगदी खरं आहे.

**– प्रियंवदा प्रकाश करंडे**
'शरद' रोड नं. ३७, वडाळा, मुंबई.

००

# श्रद्धेचे फळ

**मी** एक तरुण कॉम्प्युटर इंजिनीयर आहे. मुंबईतील एका खाजगी कंपनीत नोकरी करताना मला कंपनीतर्फे अमेरिकेला जाण्याची संधी उपलब्ध झाली. परंतु त्या वेळेस माझी तब्येत लहान-लहान कारणांमुळे एक काळजीच झाली होती. घरच्यांनी मला धीर दिला व श्री साईबाबांच्या भरवशावर मी ही संधी स्वीकारली. सगळी कागदपत्रे हाती यायला अजुन थोडा वेळ होता. पण माझ्या तब्येतीच्या लहान-लहान तक्रारी वाढू लागल्या व त्यामुळे माझे मनोबळ खचत गेले. माझ्या आईला माझी काळजी वाटू लागली. आम्ही सगळे श्री साईबाबांचे भक्त आहोत. आईने मला माझी चिंता साईबाबांवर सोपवायला सांगितली. मी श्री साईंवर विश्वास ठेवला व त्यांना प्रार्थना केली की, मला शक्ती द्या व तुम्ही मिळवून दिलेल्या संधीचा उपयोग करण्याचे सामर्थ्य द्या. मी जितकी प्रार्थना केली तेवढी माझे धैर्य वाढत गेले. जरी अमेरिकेत ४-५ महिन्यांचेच काम होते तरी ही इतके दिवस एका परक्या देशात जायचे व तब्येत बरी नसली तर काय? हा विचार सारखा मनात येत होता. शेवटी मी साईबाबांचा फोटो व उदी घेऊन अमेरिकेला प्रस्थान केले. त्यांनीच माझी काळजी घेतली व माझ्या अमेरिकेतील वास्तव्यात कुठलाही त्रास होऊ दिला नाही. या उपकाराबद्दल मी श्री साईबाबांचा सदैव आभारी राहीन. मुख्य म्हणजे असे अनुभव आपली श्रद्धा आणखी दृढ करतात.

मला एवढेच म्हणायचे आहे की, श्री साईबाबांवर श्रद्धा ठेवली व सबुरीने राहिले तर श्री साईबाबा सगळी संकटे निवारण करतात. आपल्या आई-वडिलांवर व श्री साईबाबांवर नेहमी विश्वास ठेवा.

टीप : श्री साईकृपेमुळे मी पुन्हा एकदा अमेरिकेत आहे.

**– एक साईभक्त (प्रसाद)**

# निर्वाणमंजरी
# आचार्यांचे एक आत्मविलक्षण स्तोत्र

एस. ए. कुलकर्णी

— ❖ ❖ ❖ —

**जगद्गुरु श्रीमद् शंकराचार्य म्हणजे विलक्षण बुध्दिमत्ता व जाज्वल्य भक्तीनिष्ठेचे एक तितकेच विलक्षण रसायन होते. त्यांची प्रतिभा- त्यांची प्रज्ञा - त्यांची भक्ती - आणि त्यांची तपोशक्ती सारंच काही विलक्षण. अशा महापुरुषाने लिहिलेल्या अनेक स्तोत्रांपैकी 'निर्वाणमंजरी' हे एक प्रमुख स्तोत्र आहे. त्याविषयीचा लेख.**

— ❖ ❖ ❖ —

श्रीमद् शंकराचार्य यांनी अध्यात्मपर अनेक स्तोत्रे लिहिली आहेत. त्यामध्ये 'निर्वाणमंजरी' हे स्तोत्र अतिशय महत्त्वपूर्ण आहे. तुलसीदलापेक्षा तुलसी - मंजरीला विशेष महत्त्व असते; कारण त्यामधूनच तुलसीचा उगम होतो व तुलसी फुलते. 'निर्वाणमंजरी' हे स्तोत्र अध्यात्माचा उगम - सूत्र दाखवून मनामध्ये अध्यात्माचा फुलोरा प्रस्थापित करणारे असेच आहे. स्तोत्राची रचना सुरेख आहे, त्यामध्ये सांगितिक लय आहे, मोहकता आहे व दैनंदिन पाठांतराला सुगम आहे. या स्तोत्राचं संक्षिप्त विवरण खूप उद्‌बोधक वाटेल. वाचकांना अशी खात्री वाटते. सबब हा लेखन प्रपंच. निर्वाण म्हणजे देवबुद्धिचा निरास.

**अहं नामरो नैव मर्त्यो न दैत्यो**
**न गंधर्वरक्षः पिशाच प्रभेदः ।**
**पुमान् नैव न स्त्री तथा नैव षंडः**
**प्रकृष्ट प्रकाशस्वरूपः शिवोऽ हम् ॥१॥**

मी कोण आहे? मी देव नव्हे, मनुष्य आहे, दैत्यही नव्हे. मी गंधर्व, राक्षस किंवा भूत नव्हे. मी पुरुष नाही, मी स्त्री नाही, मी नपुसंकही नाही. हे सारे भेद प्रकृतिमध्ये - देहामध्ये असतात. माझा यांच्याशी काहीही संबंध नाही. मी स्वयंप्रकाशी परिपूर्ण ब्रह्मस्वरूपच आहे. (आत्म्याचे - चैतन्याचे हे अर्थपूर्ण शब्द आहेत; 'नजर न आवे आतम् ज्योति । तेल ना बत्ती बुझ नही जाती । नही जागत नही सोती । झिलमिल झिलमिल निशीदिन चमके जैसे निरमल मोती ।' असं कबीर म्हणतात. हाच संदर्भ इथे आहे.

**अहं नैव बालो युवा नैव वृद्धो**
**न वर्णी न च ब्रह्मचारी गृहस्थः ।**
**वनस्थो हि नाहं न संन्यस्तधर्मा**
**जगज्जन्मनाशैकहेतुः शिवोऽहम् ॥२॥**

मी बालक नाही, तरुण नाही, वृद्धही नाही. मी वर्णातीत आहे. (ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य, शूद्र या भेदापासून मी वेगळा आहे.) मी ब्रह्मचारी नाही, गृहस्थाश्रमी नाही, वानप्रस्थाश्रमी नाही व संन्याशीही नाही. (चारही आश्रमाबाहेरचा मी आहे.) तर मग मी कोण ? उत्पत्ती - प्रलयाचा अधिष्ठाता असा मी परिपूर्ण परब्रह्मच आहे. असं आम्त्याचं - चैतन्याचं म्हणणं आहे. ('हा अनादि नित्य सिद्धु । निरुपाधि विशुद्धु । म्हणौनि शस्त्रादिकिं छेदु । न घडे एया।।' ज्ञानदेवांचं विवरणही असंच आहे. ज्ञानेश्वरी अ. २)

**अहं नैव मेयस्तिरोभूतमायस्**
**स्तथैवेक्षितुं मां पृथंनास्त्यु पायः ।**
**समाश्लिष्टकायत्रयोऽ प्य द्वितीयः**
**सदातीन्द्रियः सर्वरूपः शिवोऽहम् ॥३॥**

मी कूट असा प्रमेय नव्हे. मी अज्ञानापलीकडचा आहे. (ज्ञानानेच ज्ञात होणारा असाच मी आहे.) मला पाहण्यासाठी निराळ्या प्रकाश साधनाची गरज नाही. मी स्वयंप्रकाशी आहे. मला प्रकाशित करू शकणारा दुसरा कोणी असूच शकत नाही. लिंगदेह, स्थूलदेह, कारणदेह यांचा संपर्क माझ्याशी निगडीत असल्याचा 'भास' होत असला तरी मी या सर्वाहून 'स्वतंत्र' आहे. बाह्येद्रियांना मी गोचर नाही. मी सर्वरूपी मंगलमय परब्रह्म स्वरूपीच आहे. ('समं सर्व भूतेषु तिष्ठंतं परमेश्वरम्' असं भगवद्गीतेत म्हटलेलं आहे. आत्मा म्हणजेच परमात्म्याचे स्पष्ट प्रतिबिंब !)

**अहं नैव मन्ता न गन्ता न वक्ता**
**न कर्ता न भोक्ता न मुक्ताश्रमस्थ:।**
**यथाऽहं मनोवृत्तिभेदस्वरूपस्**
**तथा सर्व वृत्तिप्रदीप: शिवोऽहम् ॥४॥**

मी स्वत: मनन करीत नाही कसलंही, मी निघून जातो कुठे तरी अन् केव्हातरी असंही नाही, मी बोलणाराही नव्हे. कोणत्याही क्रियेशी माझा संबंध नसतो. मी कर्ताही नव्हे अन् भोक्ताही नव्हे. मी जीवनमुक्त अवस्थेत वावरणारा कोणी महात्मा आहे असंही नाही. मनोवृत्तीच्या रुपाने मी नटतो. मनाच्या व इंद्रियाच्या वृत्तींना मीच प्रकाशित करतो. मी सर्वांचा अधिष्ठाता - परिपूर्ण असा परब्रह्मस्वरूपीच आहे. ('उपजे ते नाशे। नाशिले पुनरपि दिशे। हे घटिकायंत्र जैसे। परिभ्रमें।' उपजे आणि नाशे। हे मायामय असे। यऱ्हवि तत्त्वत: वस्तु असे। अविनाशचि ॥' असे ज्ञानदेवांचं विवरण आहे, देह व आत्मा या संदर्भात. या मंगल स्तोत्राचे मूळ सूत्र हेच आहे.)

**न मे लोकयात्रा प्रवाह प्रवृत्तिर।**
**न मे बन्धबुद्ध्या दुरी हा निवृति:।**
**प्रवृत्ति र्निवृतिश्च चित्तस्य वृत्तिर्**
**यतस्त्वन्वहं तत्स्वरूप: शिवोऽहम् ॥५॥**

लोकांमध्ये जाणे येणे करण्याची माझी मूळ प्रवृत्ती नाही. मला बंधनाचं, दु:खाचं भय नाही, कारण मी त्यात गुंतून राहणारा नव्हे. प्रवृत्ती व निवृत्ति हे चित्ताचे धर्म आहेत, माझे नव्हेत. ज्या सत्तेमुळे चित्तामध्ये प्रवृत्ति - निवृत्तीचे धर्म निर्माण होतात तो मंगलमयी सच्चिदानंदस्वरूपी सत्ताधीश आत्माच परब्रह्म आहे. तोच मी. ('चाले हे शरीर कोणाचेही सत्ते। कोण बोलविते हरीवीण ॥ देखवी ऐकवी एक नारायण। तयाचे भजन चुको नये ॥' असं तुकोबाराय म्हणतात. हा 'नारायण' म्हणजेच आत्मा - चैतन्यरूपी अधिष्ठाता !)

**यतोऽहं न बुद्धिर्न मे कार्यसिद्धीर्**
**यतो नाहमंगं न मे लिंगभंग।**
**हृदाकाशवर्ती गतांगत्रयार्ति:**
**सदा सच्चिदानंदमूर्ति: शिवोऽ हम् ॥६॥**

मी बुद्धिस्वरूपी नाही. त्यामुळे कार्याची सिद्धी वा हानि मला सुखी व दु:खी करू शकत नाही. मी स्थूलस्वरूपी नाही व माझ्यामध्ये स्त्री, पुरुष, नपुंसक असे लिंगभेद मुळीच नाहीत. मी सर्वांच्या हृदयाकाशांत विराजमान असतो. देहांच्या उपाधींचा मला उपसर्ग होत नाही. मी सदा सर्वकाळी सद्धन, चिद्धन, आनंदघन असा 'सच्चिदानंद'च आहे. हेच माझं मंगल परब्रह्म स्वरूप। ('भानु नोहुनि रूपे जैसी। चक्षु रूपाते का प्रकाशी। आत्मा नोहुनि कर्मे तैसी। प्रकटित असे ॥' असं ज्ञानदेव विवरण करतात ज्ञानेश्वरीच्या १८ व्या अध्यायात. सूर्य प्रत्यक्षात काहीच करीत नाही. त्याच्या प्रकाशात आपल्या डोळ्यांना जग दिसू शकते, आपण आपली कर्मे करीत असतो दिवसभर. आत्म्याचा संबंध असा सूर्याप्रमाणेच अलिप्त आहे. हेच संविधान या स्तोत्रात प्रतिपादित केलेलं आहे.

**निदानं यदज्ञानकार्यस्य कार्य**
**विना यस्य सत्त्वं स्वतो नैव भाति।**
**यदाद्यन्तमध्यान्तरालान्तराल**
**प्रकाशात्मकं स्यात्त देवाहमस्मि ॥७॥**

चैतन्य हेच विश्वप्रपंचाचे अधिष्ठान आहे खरे. त्याच्या आधिपत्यावर कार्य प्रकट होते, आदि, मध्य व अंत या तिन्ही अवस्थांत हे अधिष्ठान असतेच, पण हे सारं साक्षीभूत पद्धतीने चालत असतं. म्हणून चैतन्य कार्यामध्ये विलीन झालेलं नसतं. त्याला यशापयशाचे गालबोट लागत नाही वा त्याला सुख-दु:ख भोगावं लागत नाही. देहपतनासमयी चैतन्य निघून इतरत्र जातं व त्यामुळे देहाच्या क्रिया थांबतात. ('न जायते म्रियते वा कदाचिन्नायं भूत्वा भविता वा न भूय:। अजो नित्य: शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमात्रे शरीरे ॥' भगवद्‌गीता हेच सांगते. (अ.२)

**यदासीद्विलासाद् विकारो जगद्य**
**द्विकाराश्रयो नाद्वितीयत्वत: स्यात्।**
**मनोबुद्धिचित्ताहमाकारवृत्ति-**
**प्रर्वृत्तिर्यत: स्यात्तदेवाहमास्मि ॥८॥**

चैतन्याचा विलास म्हणजेच हे जग. तथापि चैतन्य निर्विकारच असते. कारण ते अद्वितीय आहे; मन, बुद्धि, चित्त व अहंकार या सर्व वृत्तींचे ते साक्षीभूत प्रेरक असते. परंतु प्रत्यक्षात ते काहीच करत नाही. त्यामुळे कार्याचे सुख वा दु:ख त्याला अनुभवावे लागत नाही. (ज्ञानदेव विवरण करतात 'तैसी हे माया। तूं भ्रमतु आहासिवायां। शस्त्रे हाणितलेयां छाया। आंगी न रुपे ॥ का पूर्ण कुंभु उलंडला। तेथ बिंबाकारू चि भ्रंशला। परि भानु नाही नाशाला। तेयासवे ॥' जीवन म्हणजेच माया. शस्त्राने आपल्या पडछायेवर वार झाला तर प्रत्यक्ष अंगावर तो प्रक्षेपित होत नाही. किंवा पाण्याने भरलेल्या घड्यामध्ये सूर्याचे प्रतिबिंब दिसते. घडा कलंडला व सारं पाणी वाहून गेलं तर प्रतिबिंब अदृश्य होईल, सूर्य अदृश्य होत नाही. देह आणि आत्मा यांचा संबंध असाच आहे.)

**यदन्तर्बहिर्व्यापकं नित्यशुद्धं**
**यदेक सदा सच्चिदानन्दकन्दम्।**

**यत: स्थुलसूक्ष्मप्रपंचस्य भानं**
**यतस्तत्प्रसूतिस्त देवाहमास्मि ॥९॥**

आत्मा आत, बाहेर, खाली, वर, मागे, पुढे सर्वत्र अस्तित्वांत असतो. तो सर्वव्यापी आहे. मात्र तो नेहमी शुद्ध व पवित्रच असतो. त्याच्या अस्तित्वामुळेच बाह्य विश्वप्रपंचाचे भान आपल्याला होते, जाणीव होते. परंतु तो सर्वस्वी अलिप्त व निर्विकारीच असतो. (चैतन्याला कुठलीच बाधा होत नाही असं ज्ञानदेवांचं स्पष्ट विवरण आहे. 'जैसा निर्वातीचा दीपू। सर्वथा नेणे कंपू।' असं ते वर्णन करतात. वारा नसला की दिव्याची ज्योत थरथरत नाही. चैतन्याचं हे निर्विकारी अधिष्ठान समजून घेणे म्हणजेच 'अध्यात्म'.)

**यदर्केन्दुविद्युत्प्रभाजालमाला**
**विलासास्पदं यत्स्वभेदा दिशून्यम्।**
**समस्तं जगद्यस्य पादात्मकं स्याद्**
**यत: शक्तिमानं तदेवाहमस्मि ॥१०॥**

सूर्य, चंद्र, विद्युलता, अग्नि या तेजसमूहाचा विलास म्हणजेच आत्म्याचा-परमात्म्याचा अधिष्ठित विलास. आत्म्याला सजातीय-विजातीय भेद नाहीत. हात, पाय वगैरे सर्व इंद्रियांच्या आकारालाच 'देह' म्हटले जाते. अर्थात माणूस सजातीय असो वा विजातीय; त्याच्या अवयवांमध्ये फरक असत नाही. याला अनुसरुनच 'आत्मा' सर्वत्र समरुप असतो, भेदातीत असतो. यावरुनच कुळ-वर्ण-जाति भेद अनाठायी ठरतात. ('देखें भूताचेनि अनेकपणे। अनेक नोही अंतष्करणें। केवळ एकत्व चि माझे जाणे। सर्वत्र जो ॥' ज्ञानदेवांनी निवेदिलेले अध्यात्माचे 'सूत्र' याच प्रकारचे आहे. अ.६)

**यत: कालमृत्युर्बिभेति प्रकामं**
**यतश्चित्तबुध्दीन्द्रियाणां विलास:।**
**हरिब्रह्मरुद्रेन्द्रचन्द्रादिनाम**
**प्रकाशो यत: स्यात्तदेवाहमस्मि ॥११॥**

मन, बूद्धी, इंद्रिये आदींना मृत्युचे भय वाटते, मृत्युचे भय असते. कारण मृत्युद्वारे देहाबरोबरच मन, बूद्धी, इंद्रिये अकार्यक्षम होऊन जातात. परंतु चैतन्याला मृत्युची बाधा असतच नाही. ब्रह्म, विष्णु, महेश, सूर्य, चंद्र, इंद्र यांचा महिमा ज्याच्यामुळे निर्माण झालेलं आहे, ते परमतत्व म्हणजेच 'मी'. मीच परब्रह्म स्वरुपी. ('अहं ब्रह्मास्मि' याचा हाच अर्थ आहे. अर्थात देह व आत्मा यांच्यामधील फरक जाणून घेण्यातच 'अध्यात्म' समाविष्ट आहे. अध्यात्मवादी हा फरक जाणून घेऊन शुध्द आत्म्यावर आपले लक्ष केंद्रित करतो. ज्ञानदेवांनी हा विषय सुंदर दृष्टांताने खुलवून निवेदिलेला आहे. 'सलीली पय जैसे। एक होऊनि मिनलें असे। परि निवडूनि राजहंसे। वेगळे कीजे ॥ कां अग्निमुखें कीडाळ। तोडूनिया चोखाळ। निवडीति केवळ। बुध्दिमंत ॥' - राजहंस दुधातील पाणी वेगळे करुन दूध स्वीकारतो. सुवर्णामध्ये (अलंकारांत) जो हिणकस असतो, तो तापवून बाहेर काढल्यावर सोनार तथा ग्राहक 'चोख सोने' निवडतो. तसं आत्म्याला ओळखलं पाहिजे.)

**यदाकाशवत्सर्वगं शान्तरुपं**
**परं ज्योतिराकारशून्य वरेण्यम्।**
**यदाद्यन्तशून्यं परं शंकाराख्यं**
**यदन्तर्विभाव्यंत देवाहमस्मि ॥९॥**

चैतन्य तत्त्व आकाशाप्रमाणे सर्वत्र विराजमान आहे; ते शांत, सर्वोकृष्ट व प्रकाश स्वरुप आहे. त्याला आदि नाही वा अंत नाही. ज्याला 'परमेश्वर' म्हणतात तोच चैतन्यरुपी अधिष्ठित आहे सर्वत्र. बुद्धी, विचार, ज्ञान या द्वारे या आत्मतत्त्वाचे स्वरुप ज्ञात होऊ शकते, ज्याला 'अध्यात्म' हेच नाव आहे.

हे स्तोत्र म्हणजे 'आत्म्या'चे स्वगत भाष्य आहे. आपल्या सर्वच संतांनी एकमुखाने हे तत्त्व मान्य केलेलं आहे. 'तुज आहे तुजपाशी'। परि तू जागा चुकलासी।' असं संत सांगतात. वरवरच्या नजरेनं पाहणाऱ्या सामान्य मानवाला पूज्य साईबाबा यांनी सांगितलं - 'सबका मालिक एक!' पूज्य सद्गुरु श्री गजानन महाराज म्हणाले, 'गण गण गणांत बोते.' चोखा मेळा म्हणतात 'देवा नाही रुप देवा नाही नाम। देव हा निष्काम सर्वां ठायी ॥' एकनाथ म्हणतात, 'सर्वांभूतीं दिसे देव। जया ऐसा अनुभव। तया चित्ती देव वसे। जिकडे पाहे तिकडे दिसे ॥' तुलसीदास सांगतात, 'सबसे रसिये सबसे बसिये सब का लिजिये नाम। हॉजी हाँजी करते रहये बैठिये अपने ठाम ॥'' तुकाराम म्हणतात- 'अवघे जन मज झाले लोकपाल। सोइरि सकळ प्राणसखे॥, तथा 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद भ्रम अमंगळ ॥' नामदेव सांगतात- 'सर्वांभूती पाहे एक वासुदेव। पुसोनिया ठाव अहंतेचा॥' समर्थ म्हणतात, 'देह अनित्य आत्मा नित्य। हाचि विवेक नित्यानित्य। अवघे सूक्ष्माचे कृत्य। जाणती ज्ञानी॥ तो विष्णु आहे जगदंतरी। तोचि आपुल्या अंतरी। कर्ता भोक्ता चतुरी। अंतरात्मा ओळखावा॥' या संदर्भात सर्व संतांचे विचार एकात्मच आहेत. खिस्ती धर्मांतले मुख्य वाक्य आहे. 'सर्विस टु मॅनकाईंड ईज सर्विस टू गॉड?' मुस्लिम म्हणतात, 'सलाम! आलेकुं सलाम.' म्हणजे अध्यात्माची दिशा सर्वत्र एकच आहे.

याचा बोध आवश्यक आहे. गुरुदेव शंकराचार्यांचं हे महन्मंगल स्तोत्र विज्ञानवाद्यांनाही मान्य करावं लागेल. कारण 'आत्म्या'चा शोध त्यांना आजवर घेता आलेला नाही. ते आत्म्याला नाकारूही शकत नाहीत.

○○

# भारतीय आयुर्वेद

# बहुगुणी कोबी व कारल्याचा रस



शरीराचा एखादा भाग कापणे हे निसर्गोपचाराला मान्य नाही. वेदनेतून त्वरित मुक्त होण्यासाठी ऑपरेशन हा कायमस्वरूपी उपाय नाही. निसर्गोपचारामध्ये अनेक व्याधींचे ऑपरेशन टाळण्यावरही उपचार आहे. मुळव्याध, मुतखडा, अल्सर, सिझरींग, लहान मुलांचे टॉन्सिल्स, कॅन्सर, मोतीबिंदू व अन्य काही व्याधींचे ऑपरेशन टळणे शक्य झाले आहे. लेखकाने स्वत: अनेक व्याधीग्रस्तांना ऑपरेशन न करता व्याधीतून मुक्त केले आहे. आपला आहार-विहार, राहणी यावर आपले आरोग्य अवलंबून आहे.

सतत काही ना काही खात राहणे, जागरण करणे, मद्यपान, तंबाखू, विडी, सिगारेट, गुटका यांचे सेवन करणे. विरुद्ध व नियमित आहार घेणे. मलाविरोध होणे, आवश्यकतेपेक्षा जास्त खाणे, यामुळे विविध व्याधींना निमंत्रण मिळते. मलाविरोध, ॲसिडीटी निर्माण होते. मलाविरोध हे अनेक रोगांचे जसे कारण आहे तसेच मानसिक ताण तणाव हेही एक कारण आहे. या सर्वांवर आधुनिक औषधांमध्ये हमखास उपाय नाही. निसर्गाविरुद्ध जीवन जगल्यामुळे दवाखान्याची पायरी चढावी लागते. **दवाखान्यातून दूर राहण्यासाठी निसर्गोपचार हा एक उपाय आहे.** विविध रोगांवरील ऑपरेशन टाळण्यासाठी पुढील उपचार निसर्गोपचारांनी करता येतात.

**अल्सरवर पत्ता कोबी**

ॲसिडीटी झाल्यावर तिच्याकडे दुर्लक्ष झाल्यावर त्याचे रुपांतर अल्सरमध्ये होते. जेवणाचे अगोदर जठराचे जागेवर दुखते. जेवण झाल्यावर दुखणे थांबणे म्हणजे अल्सर झाला हे समजण्यात येते. अल्सरचे ऑपरेशन टाळण्यासाठी पत्ता कोबीचा रस साधारपणे १ ते १॥ महिना घ्यावा लागतो. कोबीमधील ई जीवनसत्व आतड्यात झालेल व्रणावर रामबाण उपाय आहे. **कोबीमध्ये जीवनसत्व ए, बी, सी असून अन्य घटकही आहेत.** अल्सरच्या रुग्णांस पत्ता कोबी बरोबर दुधी भोपळा, बटाट्याचा रस, काकडी रस, नारळाचे पाणी इत्यादी देतात. या उपायांबरोबर निसर्गोपचारातील अन्य उपायांची जोड द्यावी लागते व अल्सरचे ऑपरेशन टळते.

**मुतखड्यावर कारल्याचा रस प्या**

विश्वास बसणार नाही, पण **कारल्याचा रस** मी अनेक मुतखडा झालेल्यांना दिला असता मुतखडा मुत्रावाटे बाहेर पडला आहे. मात्र याचबरोबर इतरही उपचार केले. मुतखड्याचे ऑपरेशन टाळण्यासाठी कारल्याच्या रसाबरोबर द्राक्षाच्या पानाचा रस, काकडी, दुधी, भोपळा, काकडी बी, कलींगडाचे बी, तुळशीचा रस, गहू रोप रस, मध, गाजराचा रस हे उपाय मुतखड्याचे ऑपरेशन टाळतात. मात्र पालक व टोमॅटो मुतखड्यावर उपयुक्त नाही.

**मुळव्याधीवर मुळा**

मुळव्याधीचे विकरातून मुक्त होण्यासाठी गाजर, पालक, दोडके, कलींगड, टरबूज यांच्या रसाचा आश्चर्यकारक उपयोग होतो. तसेच दुधी भोपळा, कोबी, गहुरोप यांच्या रसाचे सेवनाने अनेकांचे मुळव्याधीचे ऑपरेशन टळले आहे. पाझरणाऱ्या मुळव्याधीवर कांद्याचा रस उत्तम आहे. मी काही मुळव्याधीग्रस्तांना मुळ्याच्या कोवळ्या पानाचा रस दिवसातून दोन वेळेस याप्रमाणे १५ दिवस घेण्यास सांगितले. आधुनिक औषधे बंद करावयाचे सांगितले व काही पथ्य लिहून दिले आणि ऑपरेशन टळले. निसर्गोपचारामुळे सदर मुळव्याधीचे पेशंटचे पैसे, वेळ, शारिरीक व मानसिक त्रास वाचला. हे उपचार निसर्गोपचार तज्ज्ञाचे मार्गदर्शनाखाली करावे.

**डॉ. संभाजीराव निंबाळकर**

०००

# साईचे बोल, होती न फोल

## (अनुभवकथन)


## उत्तरार्ध

— ❖ ❖ ❖ —

**कवी हेमाडपंत लिखित 'श्री साईसच्चारित' ग्रंथाच्या अमृतमहोत्सवानिमित्त, डोंबिवली येथील ॐ साई सेवक मंडळाच्या वार्षिक साईभक्त संमेलनात सेवक मंडळाच्या वार्षिक साईभक्त संमेलनात झालेल्या अनुभवकथनाचा पूर्वार्ध आम्ही 'श्री साईलीला' च्या सप्टे-ऑक्टोबर ९६ च्या अंकात दिला होता. त्याचा उत्तरार्ध काही कारणामुळे आमचे हाती उशिरा आला, तो या अंकात प्रसिद्ध करीत आहे.**

— ❖ ❖ ❖ —

**साई साई नित्य म्हणाल ।**
**सात समुद्र करीन न्याहाल ।**
**या बोला विश्वास ठेवाल ।**
**पावाल कल्याण निश्चये ॥१२॥**



श्री साई सच्चरितातील तेराव्या अध्यायात दयाधन अशा श्री साईसमर्थांनी भक्त कल्याणासाठी जिव्हाळ्याचे असे हे बोल आहेत. त्याविषयीचा अनुभव सांगती आहे साईभक्त **जया.**

**अनुभव :** खरंच साईबाबा आपल्या हाकेला ओ देतात का ? यावर आपण विश्वास ठेवायचा का? स्वत:च्या अनुभवाशिवाय हे सांगणे चुकीचे आहे असे वाटते. माझा अनुभव हृदयस्पर्शी आहे. कारण त्याद्वारे साईबाबा भक्तांच्या नाम स्मरणास दाद देतात. त्यापासून भक्ताला सुख देण्याचा प्रयत्न करतात हे सिद्ध होते.

मला पोटदुखीचा त्रास होता. त्यावर ऑपरेशन हाच एक उपाय होता. डोंबिवलीतील डॉ. कामतानी ऑपरेशनची वेळ, दिवस निश्चित केला. हॉस्पिटलमध्ये जाताना बाबांची छबीबरोबर घेतली. बाबांना म्हटले बाबा तुमच्या समवेत ऑपरेशनसाठी जात आहे. त्यातून तुम्हीच सुखरूप परत आणायचे आहे. डॉक्टरांनी छोटेसे सांगितलेले ऑपरेशन वास्तविक मोठे होते. ऑपरेशननंतर जेव्हा शुद्धीवर आले. त्यावेळी साईभक्त मय्याजवळ होती. तिने धीर दिला. तो जणू बाबांनीच दिला असे वाटले. खूप बरे वाटले.

अचानक ३, ४ दिवसांनी श्वास कोंडल्यासारखे झाले. डॉक्टर्स एका ऑपरेशनमध्ये गुंतलेले होते. नर्सने गोळ्या दिल्या; पण आराम नाही वाटला. अस्वस्थपणा वाढला. त्यावेळी नेमके घरच्या पैकी कोणीच जवळ नव्हते. जीव जातो की काय असे वाटू लागले. डॉक्टरांच्या सांगण्यावरून नर्सने झोपेचे इंजेक्शन दिले. मला ग्लानी येऊ लागली. तेवढ्यात माझे लक्ष पायाकडे गेले. तो काय आश्चर्य पहा. पांढरी शुभ्र वस्त्रे घालून बाबा माझ्याजवळ आले. डोक्यावरून हात फिरवला. म्हणाले, ''काळजी करू नकोस. शांतपणे झोप आता. काही होणार नाही तुला.'' एवढे बोलून मला उदी देऊन त्यावर पाणी पिण्यास दिले. मला केव्हा झोप लागली ते कळलेच नाही. थोड्या वेळाने डॉक्टर आले. त्यांना आश्चर्य वाटले. म्हणाले, तू तर ठिक आहेस. नर्स उगीचच काही सांगते.

तेव्हा मी त्यांना सांगितले, प्रत्यक्ष साईबाबांनी येऊन मला उदी व पाणी दिले. सर्व ठिक होईल असे म्हणून ते डोक्यावरून

हात फिरवला. डॉक्टरांना विश्वास वाटला. म्हणाले, साईबाबांबद्दलची स्मरण भक्ती तुझी प्रबळ आहे. ऑपरेशनच्या दुसऱ्या दिवशीही २८ टाके पडूनसुद्धा तू दुसऱ्या खोलीत चालत गेलीस हे सुद्धा आश्चर्यच आहे.

तू घरी जाताना साईबाबांची ही छबी मला देऊन जा त्यामुळे हॉस्पिटलमध्ये साईबाबा येऊन गेले हे मला सारखं जाणवत राहील. त्याप्रमाणे १० दिवसानंतर घरी जाताना साईबाबांची ती छबी मी डॉक्टर कामतांना दिली. आता माझी तब्येत व्यवस्थित आहे.

साईबाबांचे नामस्मरण करीत राहाल तर साई तुम्हाला संकटातून मुक्त करतात. त्यासाठी ते सातासमुद्राच्या पलीकडे असले तरी भक्तांच्या हाकेला ओ देतात. हे अनुभवाशिवाय कळणार नाही व अनुभवासाठी 'साई-साई' म्हणणे अत्यंत आवश्यक आहे. ॐ साईराम!

* * *

**निवेदन : आताच आपण साई साई नित्य म्हणाल। सात समुद्र करीन न्याहाल। ह्या बाबांच्या बोलाप्रमाणे आलेला अनुभव साईभगिनी जयाकडून ऐकलात**

सात समुद्र नाही, पण असह्य वेदना, ऑपरेशनची भिती यातूनही नित्य घडणाऱ्या साई-साई या स्मरणातून बाबांनी त्यांना खरोखरच जीवनदान न्याहाल केले आहे.

थोडीफार अशाच प्रकारची घटना बाबा देहधारी असताना घडलेली आहे. नानासाहेब चांदोरकर बाबांचे निस्सिम भक्त. त्यांची मुलगी बाळंतपणासाठी अडलेली. त्यावेळी आतासारख्या सुविधा हॉस्पिटल्स नव्हती. नानासाहेबांचा बाबांच्या नावे सारखा धावा चाललेला ही घटना घडत होती एका गावात, पण बाबांना ते समजले शिरडीत. लगेचच बाबांनी माधवरावांकरवी आरती साईबाबा लिहून उदी प्रसाद बापूगीरा समवेत चांदोरकरांकडे पोहोचता केला. ती आरती म्हणताच व उदी पाण्यातून पिताच त्या मुलीची बाळंतपणात सुखरूप सुटका झाली.

असे हे साईबाबा आपले बाबा ते बाबाच!! लौकिक दृष्ट्या देहधारी असोत वा नसोत, पण आमचा अनुभव सांगतो ते आहेत. आहेत. आहेतच.

**संत सृष्टी माजी उमाप। 'आपुला बाप तो आपुला बाप'।**
**साईमुखीचे हे करुणालाप। कोरा स्वहृदयपटावरी ॥११९॥**

**म्हणोनि साईमुखीचे वचन। तेथेच ठेवा अनुसंधान।**
**अंती तोच कृपानिधान। तापत्रय शमन करील ॥१२०॥**

अशा ह्या साईकृपानिधानाचे नामस्मरणी अनुसंधान ठेवल्यामुळे आलेली वेळ कशी निभावून गेली ते सांगत आहेत **श्री. ठाकूर**

**तुम्ही कोणी कुठेही असा। भावे मजपुढे पसरिता पसा।**
**मी तुमचिया भावासरिसा। रात्रंदिसा उभार ॥६७॥**

दासगणुचे कीर्तनात श्री साईबाबांची महती ऐकून चोळकरांनी साईबाबांना नवस केला. बाबा माझा गरिबाचा संसार सर्वस्वी नोकरीवरच अवलंबून आहे. ती तुमच्या कृपेने परिक्षा पास झालो तर शिरडीत येऊन सर्वांना खडीसाखर वाटीन. त्याप्रमाणे परिक्षेत पास होऊन त्यांना नोकरी लागली. पण शिरडीला जाणे तसेच राहून गेले. म्हणून चोळकरांनी साखरेचा चहा पिणे सोडून दिले. परंतु जेव्हा त्यांचे शिरडीस जाणे झाले. त्यावेळी त्यांना पाहिल्यावर बाबांनी जोगांना सांगितले, यांना साखर घातलेले चहाचे पेले दे. चोळकरांना आपण साखर खात नाही हे बाबांना कसे कळले याचे आश्चर्य वाटले.

**अनुभव :** या बाबतीत माझा नुकताच अनुभवलेला अनुभव नमुद करणे आवश्यक वाटते. नुकत्याच ८ मे १९९६ रोजी झालेल्या निवडणुकीसाठी माझी क्षेत्र क्र. १० मध्ये क्षेत्र अधिकारी म्हणून नेमणूक झाली होती. सायंकाळी ५ नंतर माझ्या अखत्यारीत असलेल्या ११ केंद्राचा पुरुष / स्त्री, साक्षर / निरक्षर असा दिवस भरातील प्रत्यक केंद्राचा अहवाल द्यायचा असतो. त्यावेळी असे झाले की, माझ्याकडे दिलेल्या १ बस व १ टेंपो पैकी ६ केंद्राध्यक्ष व केंद्राधिकारी यांनी बसमध्ये येऊन त्यांच्या पेटचा व हजर कागदपत्रे हस्तांतरीत करून निघून जाण्याचा प्रयत्न करीत होते. परंतु, त्यापैकी एक केंद्राध्यक्ष व त्याचे सहकारी निघून गेल्यामुळे एका केंद्राचा पूर्ण तपशील (सायंकाळी ३ ते ५ पर्यंतचा) मिळू शकला नाही. त्यावेळी मात्र मला भिती वाटली. चुकून खोटा अहवाल दिल्यास काहीतरी नुकसान होऊ शकत होते. तसेच अहवाल लिहिण्यास कोरा कागद व कॅलक्युलेटर नव्हता.

अशा अडचणीच्या वेळी साईभक्तांना एकच 'काडीचा आधार' असतो व तो म्हणजे नामस्मरण. बाबांचा धावा. तोच मी केला. त्याचवेळी एक क्षेत्र अधिकारी मित्र विचारल्याबरोबर कोरा कागद देऊन गेला व दुसऱ्या एकाने कॅलक्युलेटर दिला. अशा रितीने तो अहवाल थोडा इकडेतिकडे करून सादर केला.

तहसीलदाराने तो घेऊन ठीक म्हणून बाजूला ठेवला. हे सर्व होता होता रात्री १०.४५ वाजले. मी बाबांचे नाव घेऊन सुटकेचा निश्वास टाकला. त्यावेळी जर 'कोरा कागद, कॅलक्युलेटर' कोणी तरी दिला नसता तर?

थोडक्यात नामस्मरणाचा महिमा हा असा आहे. बाबांच्याच शब्दात सांगायचे म्हणजे 'भवसागर' ज्यांना पार करावयाचा आहे त्याने नामस्मरण करणे अत्यावश्यक आहे.



**ऐसा तुम्हा हृदयस्थ जो मी।**
**तयासी नमा नित्य तुम्ही।**
**भूतमात्राच्याही अंतर्यामी।**
**तोच तो मी वर्तता॥**

अशा या राजाधिराज साईस जिथे हाक मारताच इच्छा पूर्ण होतात अशा साई दरबाराचा अनेकांना अनुभव आहे. हा साईदरबार ज्यांच्याकडे असतो त्या आमच्या अध्यक्षपत्नी **सौ. बाकळे** एक अनुभव सांगत आहे.

**तो जे करील तेच होईल।**
**मार्ग तयाचा तोच दावील।**
**क्षण न लागता वेळ येईल।**
**मुराद पुरेल मनींची॥१४९॥**

* * *

**निवेदन : परी एक सांगतो शामा। प्रेमे घेईल जो मन्नामा।**
**त्यांच्या मी सकळ कामा। पुरवी प्रेमा वाढवी॥११॥**

असा हा शाम्याचे निमित्त आपणास सांगितलेला उपदेश श्री. ठाकूर नित्य नेमाने नामस्मरण करून आचरणात आणप असल्यामुळेच की काय कुठे इलेक्शन ड्युटीमुळे आलेले ठिकाण तर कुठे बाबा समाधिस्त असलेली शिरडी. दोन्ही मध्ये महदअंतर. परंतु श्री ठाकूरांचे स्मरण ऐकूण बाबा आज देहधारी नसूनही कोणा एका व्यक्तिच्या रुपाने येऊन त्यांना अहवाल सादर करण्यासाठी कागद, कॅलक्युलेटर देऊन गेले.

**तुम्ही कोणी कुठेही असा। भावे मजपुढे पसरिता पसा।**
**मी तुमचिया भावासरिसा। रात्रंदिसा उभाच॥६७॥**

स्वत: बाबांनी चोळकरांना उद्देशून उद्‌गारलेल्या बोलाची प्रचितीच श्री. ठाकूरांनी अनुभवली.

बघा बरं आपली साईमाऊली किती नटनाटकी आहे ती. इथे देहधारी नसताना श्री. ठाकूरांना अहवालासाठी कागद दिला त्याच साईबाबांनी देहधारी असताना बाळकराम मानकर या आपल्या भक्तास पुण्याहून दादरपर्यंत तिकीट कुणब्याच्या वेषात येऊन दिले. (अ.११) पैसे सुद्धा घेतले नाहीत.

बाबांनी म्हटलेच आहे ना -
**कुठेही जा दुनियेवर। मी तो तुम्हाबरोबर।**
**तुम्हा हृदयीच माझे घर। अंतर्यामी तुमचे मी॥६९॥**

एकदा मध्यान्ह आरतीच्या वेळी बाबा भक्तमंडळींशी सूचक मतितार्थ असलेला संदेश, उपदेश करत होते. त्यावेळी अल्लामालिक, सचिदानंद परमात्म्यासंबंधी बोलताना बाबा म्हणाले,

**''तो जे करील तेच होईल। मार्ग तयाचा तोच दावील।**
**क्षण न लागता वेळ येईल। मुराद पुरेल मनींची॥**

**अनुभव :** बाबा नेहमी अल्ला मालिक म्हणायचे, परंतु आमच्यासाठी अल्लामालिक म्हणजे साईबाबा. तसेच आमच्या घरी दर गुरुवारी रात्री साई दरबार भरला जातो. यात अनेक साईभक्त येतात. आपापल्या समस्या व गाऱ्हाणे साईबाबांना सांगतात. त्यामुळे त्यांच्या समस्या सुटतात.

साईदरबारात येणाऱ्या एका मुलीचे लग्न जमत नव्हते. ती आरतीला नेहमी यायची. एकदा ती मला म्हणाली, माझे लग्न जमत नाही.'' मी बाबांना तिचे गाऱ्हाणे सांगितले.

खरंच मी तुम्हाला सांगते की, त्या मुलीचे तीन गुरुवार नंतर लग्न जमले. एका वर्षाच्या आत मुलगापण झाला. म्हणून मला वाटते व तुम्हालाही सांगायचे की बाबांवर विश्वास ठेवा.

**तो जे करील तेच होईल। मार्ग तयाचा तोच दावील।**
**क्षण न लागता वेळ येईल। मुराद पुरेल मनाची॥१४॥**

* * *

**निवेदन :**

**साक्षात्कार कित्येकांसी । दृष्टांतानुभव बहुतेकांसी ।**
**चमत्कार तो अनेकांसी । गुप्तरुपेसी दाविती ॥१४५॥**
**अभाविकां गुप्त असरसी । भक्तां भाविका ठाईच दिसती ।**
**जैसी जयाची चितवृत्ती । तैसीच अनुभूति रोकडी ॥१४६॥**

असे अनेक अनुभव अनेकांनी जिथे घेतले तो 'साईदरबार' सौ. बाकले यांच्या इथे दर गुरुवारी असतो.

आताच आपण त्यांनी सांगितलेला अनुभव ऐकलात. एका मुलीचे लग्न होत नव्हते ते झाले. लवकरच तिला एक मुलगाही झाला. साईदरबारात त्या मुलीने घातलेले गाऱ्हाणे बाबांनी ऐकले.

यावरून श्री साईसच्चरितामधील माधवराव देशपांडे आणि बाबा यांच्यामधील एक मजेशीर संवादाचा प्रसंग मला आठवला पहा.

श्री. सखाराम औरंगाबादकर यांची पत्नी पुत्रसंतान व्हावे या इच्छेने बाबांचा आशीर्वाद घेण्यास शिरडीस आली. पण तिला बाबांचे दर्शन होईना. म्हणून तिने माधवरावांना विनंती केली. माधवरावांनी नारळ उबदत्ती घेऊन उभे राहण्यास सांगितले. योग्य वेळी तिला बाबांच्या दर्शनास बोलवले. तिने बाबांना नमस्कार करून त्यांच्या चरणी श्रीफळ अर्पण केले. बाबा हातात नारळ घेऊन म्हणाले, ''शामा हा नारळ फारचिरे गुडगुडतो.'' शामा ती संधी साधून बाबांना म्हणाले, ''माझिये पोटी ऐसेच गुडगुडो। बाई ही मनी म्हणे ते घडो। अखंड मन तव चरणी जडो। कोडे उलगडो तिथेचे.'' बाबा वदती ''काय नारळे पोरे होती।'' बाबा त्या स्त्रीस नारळ प्रसाद व आशीर्वाद देतात मुल होईल म्हणून.

तुला मुल झाले नाही तर या देवास इथून हाकलून देईन म्हणून सांगणारा भक्त शामा आणि त्यांचा देव साईबाबा यांच्यातील संभाषण प्रसंग क्षणार्धात डोळ्यासमोर उभा राहिला नाही का? पुढे बारा महिन्यात त्या स्त्रीला मुलगा झाला. बाबांचा आशीर्वाद खरा ठरला. असे हे बाबा साई असती-

**चावडीत गुप्तरुप। मशिदीत ब्रह्मरुप।**
**समाधित समाधिरुप। सुखस्वरूप सर्वत्र ॥१४७॥**
**असो सांप्रत हाच विश्वास। भक्ति धरावा निज जीवास।**
**भंग नाही समर्थ साईस। अक्षय रहिवास अखंड ॥१४८॥**

आताच साईदरबारातील अनुभव ऐकलात. असाच एक साईंचा बोल **श्री. बाकळे** यांच्याकडून त्यांच्या मित्रास सावध करण्यासाठी वेळीच कसा वदवला गेला हे आपण त्यांच्याकडूनच ऐकूया.

**''सांग की तयास प्रत्युतरी। काय उणे तुज असता घरी।**
**पुरे आपुली अर्धी भाकरी। लाखाचे भरी पडू नको ॥४५॥**

नगरचे दामूशेट साईबाबांचे भक्त, गुरुपुत्र. त्यांच्या मुंबईच्या मित्रांनी दामूअण्णांना कापसाच्या धंद्यात लाख लाख फायदा होईल. आपण भागिदारीत करू असे सांगितले. दामूशेटना आनंद झाला. पण तरी सुद्धा आधी बाबांना विचारूया. म्हणून त्यांनी बाबांना पत्र पाठवून परवानगी मागितली. त्यावेळी त्याला उत्तर म्हणून बाबा म्हणाले, ''काय उणे तुज असता घरी। पुरे आपुली अर्धी भाकरी। लाखाचे भरी पडू नयो ॥४५॥ अ. २५

**अनुभव :** माझे मित्र अडीअडचणीच्या वेळी मला विचारून निर्णय घेत. असाच माझ्या एका मित्रास दामूशेटप्रमाणे अनुभ आला. त्यास त्याच्या काही व्यापारी मित्रांबरोबर एका धंद्यात भागिदारी करायची होती. व्यापारी अंदाजाप्रमाणे त्यात खूप फायदाच फायदा होता. परंतु तसा थोडा फार धोकाही होता. त्यामुळे धंदा करू की नको या विंवंचनेत तो होता. त्याने माझ्याजवळ ही गोष्ट बोलून दाखविली. माझ्या तोंडून नकळत शब्द बाहेर पडले, ''अरे आपली जी अर्धी भाकरी आहे तेवढी बस झाली. उगीच मित्रांच्या नादाने जोखमीच्या धंद्यात पडू नकोस. किती झाले तरी ते व्यापारी आहेत. आज इकडचा पैसा ते तिकडे कमवतील.'' माझ्या या बोलण्यावर तो थोडासा नाराज झाला. त्याने पुन: एकदा मला बाबांना विचारण्यास सांगितले. मी शिरडीत जाऊन बाबांना विचारले असता बाबांनी पण मला नकारार्थी उत्तर दिले.

हे ऐकून तो म्हणाला, तुला सांगितले नसते तर बरे झाले असते. 'तुझ्या नन्नाच्या पाढ्यांमुळे धंदा सोडून दिला. त्यात खूप फायदा होता. घरातील पण सर्व नाराज झाले.

काही दिवसांनी त्यानेच बातमी आणली. त्या धंद्यातील लोकांना खूप नुकसान झाले. त्यांचे आर्थिक, मानसिक दृष्ट्या खूपच हाल झाले. इतके सांगून तो मला म्हणाला, बरे झाले मी तुझे ऐकले ते. तुझ्या रुपानी बाबांनीच मला वाचवले असे म्हणून त्याने बाबांचे आभार मानले. ॐ साईराम.

**गुरु एक जाणे शिष्यांचे हित। भावीभूत वर्तमान ॥५६॥**
**तरला बिचारा फकीराचे नादीं। काय दृढबुद्धि तयाची ॥८३॥**

खरच आहे. बाबांवरील विश्वासाने दामूशेटनी धंद्यात भाग नाही



घेतला. इकडे त्या मित्राचे जो दामूशेटना मुर्ख म्हणत होता. त्याचे नुकसानच नुकसान झाले. केवळ बाबांमुळेच दामूअण्णा नुकसानीतून वाचले.

सद्गुरूवर अनन्य श्रद्धा पाहिजे. त्यांनी काहीही सांगितले मग ते वरवर दिसायला कितीही विचित्र आणि अपायकारक असले तरी त्याप्रमाणे वागण्यास आपण कचरले न पाहिजे. दामूअण्णांनी कापसाचा किंवा धान्याचा सौदा न करण्याचा सल्ला ऐकला म्हणूनच त्यांचा धोका टळून त्यांचे कल्याण झाले.

माणसाने पैसे कमविण्याचा अतिलोभ करू नये. धन जरुर कमवावे. धनाशिवाय या जगात काहीच करता येत नाही. परंतु तो चटकन आणि खूप मिळावा म्हणून सट्यासारखे जोखमीचे व्यवहार बाबांना पसंत नव्हते.

तद्वत आताच ऐकलेल्या अनुभवात त्या मित्रास जास्तीचा धंदा लाभदायक नव्हता. म्हणून त्या साईमित्रास हानी होऊ नये म्हणून की काय बाबांनी आपल्या भक्तांद्वारे त्यास नवीन धंद्यातून माघार घ्यावयास भाग पाडले. तसे केल्याने त्यांचा फायदाच झाला.

**साईमुखी वदले जे अक्षर । ते तो निर्धार ब्रह्मलेख ॥११९॥**

* * *

**निवेदन :**

**असे वदले हे साईसमर्थ । काहीच कळेना अर्थ ।**
**काय असावा की भावार्थ । वाणी निरर्थक नव्हे सदा ॥१२३॥**

खरच आहे बाबांची वाणी कधीच निरर्थक नव्हती. अशा ब्रह्मलिखीतच असलेल्या बाबांच्या वचनाबद्दल श्री. शिंदे काही सांगू इच्छितात ते ऐकू या हं.

**झालो जरी गतप्राण । वाक्य माझे माना प्रमाण ।**
**माझी हाडे तुर्बतीमधून । देतील आश्वासन तुम्हास ॥१०५॥**

श्री साई सच्चारितातील अ. २५ मध्ये बाबांचे भक्त दामूअण्णा यांना दोन पत्नी असूनसुद्धा संतती लाभ नव्हता सर्व उपाय करूनही काही झाले नाही. ज्योतिषाने सांगितले तुमच्या नशिबातच मूल नाही. त्यावर विश्वास ठेवून अण्णा शिरडीत आले. परंतु बाबांनी आपल्या कृपाशिर्वादाचे आंबे देऊन त्यांना संतती प्राप्त करू दिली. अशा या साईबाबांचे बोल आजतागायत खरे होत आहेत.

**अनुभव :** एके दिवशी स्वनात बाबांच्या पादुका दिसल्या आणि आरतीची घंटा ऐकू आली. स्वप्न जणू शुभशकून असल्यासारखेच वाटले. नित्यनियमानुसार जवळील देवळातून काकड आरती करून आलो.

त्याच दिवशी एक साईभगिनी माझ्याकडे आली. तिने मला ॐ साई सेवक मंडळाचे सभासद करून घेतल्याची बातमी दिली.

सकाळच्या शुभस्वप्नाची प्रचिती पटली. मंडळाच्या निमित्ताने साईसहवास, साईभक्त परिवार, साईसेवा, साईभक्ति अनेक माध्यमतून घडत गेली. अशा तऱ्हेने बाबांनी अकल्पित साईसेवेचा योग आणला. अशीच साईकृपा माझ्या परिवारावर कायम रहावी ही साईचरणी प्रार्थना आहे. ॐ साईराम ।

* * *

**निवेदन :**

**भक्तांनिर्गुण ठायी पडावे । बाबांनी अनंत उपाय योजावे ।**
**अधिकारानुरुप दूर बसवावे । दर्शन वर्जावें बहुकाल ॥१८॥**
**एकेकास देशांतरा पाठवावे । एकास शिरडीत एकांती कोंडावे ।**
**एकास वाड्यात अडकवावे । नेम द्यावे पोथीचे ॥१९॥**
**वर्षानुवर्ष हा अभ्यास । होता वाढेल निर्गुण ध्यास ॥**
**आसनी शयनी भोजनी मनास जडेल सहवास बाबांचा ॥२०॥**

तद्वतच साईभक्त शिंदे यांना बाबांनी देहत्यागानंतरही स्वप्नात दृष्टांत देऊन आशिश दिला. जणू काही ॐ साई सेवक मंडळात सामील होण्याची पूर्व सूचनाच दिली. त्यामुळे साईभक्त परिवार, साई संमेलन, साई भजने, शिरडी यात्रा, पोथीवाचन चर्चा, साईवर आधारित कार्यक्रम हे सर्व त्यांच्याकडून सातत्याने घडते गेले. आधीच लिखाणाची, काव्य, गाणी करण्याची सवय असलेल्या साईभक्त शिंदे यांची साईविचारांची स्फूर्ति वाढून त्यांचे बाबांवरचे

लिखाण वाढले. संमेलनात दरवर्षी साईगाणी, गवळण, पोवाडे, ईश्वस्तवन, भजन, नाटक अशा स्वरूपातून त्यांची साईकाव्यदेवता सादर होऊ लागली. साईची अशी आगळी वेगळी सेवा करण्याचे भाग्य त्यांना मिळू लागले.

**धन्य धन्य सद्गुरुसंगती ।**
**कोणा वर्णवे तिथेची महती ।**
**आठवितां एकेक तयांच्या उक्ती ।**
**निज काव्य स्फूर्ति उचबंळे ॥**
**धन्य धन्य सद्गुरू संगती ।**
**कोणा वर्णवे तियेची महती ।**

अशा या सद्गुरू साईनाथांच्या संगतीत श्री शिंदेच आहेत असे नाही तर त्यांचा सर्व परिवारच आहे. नाहीतरी बाबांना दुसरे काय हवे असते.

**दोन हात एक माथा। स्थैर्य श्रद्धा अनन्यता ।**
**नलगे दुजे साईनाथा। एक कृतज्ञता ते व्हावी ॥१८०॥**

अशा या अनन्य श्रद्धेचा श्री. शिंदे यांची पत्नी प्रणालीस कसा अनुभव आला ते आपण ऐकू या.

**टाकूनिया मजवरी भार। मीनला जो मज साचार।**
**तयाचे सर्व शरिर व्यापार। मी सूत्रधार चाळवी ॥२००॥**

श्री साई सच्चारितातील अ. २८ मध्ये बाबा आपण सर्वव्यापी सृष्टीत कसे आहोत हे सांगतात.

बाबांचा भक्त मेघा हा शंकर भक्त होता. एकदा बाबांनी मेघास दृष्टांत देऊन सांगितले, 'त्रिशुळ काढ' आणि अक्षता टाकल्या आणि बाबा अंतर्धान पावले. मेघा डोळे उघडून पाहतो तो बिछान्यावर तांदूळ पडलेले. बाड्याचे तर दरवाजे बंद. असे असतानाही बाबा कसे आले. याचे मेघास कोडे पडले. त्याने मशिदीत जाऊन बाबांना दृष्टांत सांगितले. त्रिशूळ काढण्याची परवानगी विचारली. तेव्हाबाबा त्यास म्हणाले, माझे बोल कधी फोल होणार नाहीत.

**माझिया प्रवेशा न लगे दार। नाही मज आकार ना विस्तार ।**
**वसे निरंतर सर्वत्र ॥ १९९॥**
**टाकूनिया मजवरी भार। मीनला जो मज साचार ।**
**तयाचे सर्व शरीर व्यापार। मी सूत्रधार चाळवी ॥२००॥**

**अनुभव :** एकदा मी थंडीतापाने खूप आजारी होते. डॉक्टरी उपाय करूनसुद्धा काही फरक पडत नव्हता. सतत बाबांचे नामस्मरण चालू होते. अशीच तापाची ग्लानी आली असता एक वृद्ध माणूस जवळ आला. डोक्यावर हात फिरवून म्हणाला, बेटा डर मत। सब ठिक हो जायेगा। मला अ. २३ मधील ओ. क्र. ५३ आठवली.

**न सोडी धीर । काहीही मनी न करी जिकीर ।**
**बरे होईल सोडी फिकीर। दयाळू फकीर सांभाळील ॥५३॥**

त्यानंतर लवकरच मला आराम पडू लागला मी बरी झाली. हा केवळ बाबांचीच कृपा प्रसाद आहे. ॐ साईराम

* * *

## निवेदन :

आमची ही साई भगिनी **प्रणाली** अहो दुसऱ्यास बरं नसल तरी घाबरी होऊन बाबांना हाका मारणार. आता तर काय तिला स्वत:लाच थंडी ताप आणि तोही डॉक्टरांच्या उपायाने बरा होत नव्हता. म्हणजे ती त्या शिरडीतल्या फकीरास किती हाका मारीत असेल नाही का? बघा बर शेवटी त्या फकीरबाबास स्वप्नात येऊन तिला धीर द्यावा लागाला. बेटा डर मत सब ठिक हो जायेगा। त्यानंतर तिला आराम पडू लागला.

तिचा हा अनुभव ऐकून मला श्री साईसच्चरितातील एक प्रसंग आठवला पहा - बाबांचा भक्त भिमाजी पाटील यांचा

**स्वप्नास जन आभास म्हणती । परी कधी ये उलट प्रतीति ।**
**तेच मुहुर्ती रोगोच्छिति। दु:ख निवृत्ति पाटीला ॥१७२॥**

जुन्नरचे भिमाजी पाटील यांना क्षयरोग झाला होता. दुखण्यास उतार पडत नव्हता. शेवटी कंटाळून ते शिरडीस बाबांच्या दर्शनास आले. बाबांनी त्यांना ओली जमीन असलेल्या घरात राहण्यास सांगितले. भिमाजीने आज्ञा पाळली. रात्री झोपेत त्यांना स्वप्नात लहानपणीच्या पंतोजीने येऊन छडीने मारलं. सवाई पाठ होत नव्हती म्हणून. तर एका गृहस्थाने वरवंटाने छातीवर मारले जीव जणू जातो असे झाले. बस्स एवढच स्वप्न परंतु सकाळी उठताच भीमाजीस खूप तरतरी वाटली. आजार निघून गेल्याची जाणीव झाली. हळूहळू ते बरे झाले. अशी आहे आपली साईमाऊली कनवाळू.

प्रणालीचा बाबांच्या नावाने चाललेल्या धावा ऐकून बाबाना यावच लागलं. बाबांचे सांगणेच आहे आपल्या भक्तांना

**साई साई ती नामस्मरण । करील सकल कलिमल दहन ॥२०॥**

**समाप्त**

ooo

# दत्तप्रेमी तीन योगमूर्ती

गजानन कुलकर्णी

— ❖ ❖ ❖ —

**अनादी कालापासून दत्त भक्तीचा महिमा संबंध भरत वर्षात अखंड निनादत आला आहे. विशेषतः महाराष्ट्रात दत्त भक्तीचा प्रसार आणि प्रचार फार पूर्वापार कालापासून झालेला आपल्या दृष्टोत्पत्तीस येतो. प्रत्येक शतकात दत्त संप्रदायात दोन महान योगमूर्ती उदयास आलेल्या असून त्यांनी या भक्तीसंप्रदायाचा नंदादीप अखंड तेवत ठेवलेला आहे. इ. स. १४ व्या १५ व्या शतकात अशाच तीन महान दत्तभक्त, योगमूर्ती उदयास आल्या होत्या. ह्या तिघांचेही कार्य आपापल्या परीने महान असून आजही त्यांच्या शिकवणुकीची छबी जनमानसावर कायम कोरलेली आहे अशा या तीन दत्तभक्तांचा परामर्ष घेणारा एक विशेष लेख-**

— ❖ ❖ ❖ —



## जनार्दन स्वामी

इस्लामी सत्तेत देवगिरी अथवा दौलताबाद येथे अधिकारावर राहून दत्तोपासनेचा प्रसार करणारे व एकनाथावर अनुग्रह करणारे म्हणून थोर दत्तोपासक श्री जनार्दन स्वामी यांचे नाव महाराष्ट्रभर प्रसिद्ध आहे. फाल्गुन व ६ शके १४२६ रोजी चाळीसगावच्या देशपांडे घराण्यात यांचा जन्म झाला. जनार्दन स्वामी हे शुल्क यजुर्वेदीय वाजसेनार्थ माध्यंदिन ब्राह्मण होते. नित्य धर्मकृत्ये आणि पूजा-उपासनीय यात त्यांना लहानपणापासून गोडी वाटत होती. हीच बालपणातील गोडी त्यांना उत्तरोत्तर प्रगतीला कारणीभूत ठरली. आणि भक्तीच्या शिखरावर घेऊन गेली.

१४४७ मध्ये त्यांनी एकाच कुलगोत्रातील दोन मुलींशी लग्न करून गृहस्थाश्रम प्रारंभ केला. भगदृचिंतन स्नानसंध्यादि कर्मे, अतिथिसेवा, राजकार्य आणि सावित्री-रमा या दोन स्त्रियांशी संसार, असा त्यांचा जीवनक्रम होता. राजकारणात नित्य दगदग, वसुली, अधिकारी लोकांची ताबेदारी, यवनांची लहर, हीन लोकांशी संबंध यातून त्यांना मार्ग काढायचा होता. स्वधर्मनिष्ठा राखायची होती. घरातील दत्तोपासना वाढवायची होती. कृष्णातीरी असलेल्या अंकलखोप, कुरवपूर, वाडी, औदुंबर इत्यादी दत्तस्थानांना ते भेटी देत असत. अंकलखोप येथेच त्यांना दत्तात्रेयांनी अनुग्रह दिला.

देवगिरीवर येऊन जनार्दन स्वामींनी यवनसेना पत्करली. देवगिरीच्या या प्रसिद्ध स्थानाभोवती जनार्दन स्वामी आणि एकनाथ यांच्या अनेक रम्य व भावगर्भ स्मृती एकवटलेल्या आहेत. दुर्गातीर्थ व श्रीगोरक्ष गुहा ही दोन स्थाने त्या काळी भाविकांना सुखावणारी होती. जनार्दनपंतांनी यवनसेवा पत्करूनही आपली धार्मिक वृत्ती सोडली नाही. नित्याचे आन्हिक, गुरुचरित्र, ज्ञानेश्वरी इत्यांदी ग्रंथाची पारायणे, नामस्मरण व राजकारण यात त्यांचे चित्त रंगून गेले होते. गोरक्षगुहा आणि गडाखालील सहस्त्रस्तंभ देवीजवळचे स्थान या ठिकाणी एकान्तात त्यांची ध्यान धारणा चालत असे.

जनार्दन स्वामीचे नैष्ठिक आचरण व दत्तभक्ती यांचा प्रभावी यवनसत्तेवर ही त्याकाळी पडला होता. याची साक्ष म्हणून असे सांगितले जाते की जनार्दन स्वामी आणि त्यांच्या परिवारास सोईचे व्हावे म्हणून देवगिरीच्या आसपास शुक्रवार ऐवजी गुरुवारची सुट्टी असे. देवगिरीच्या ह्या सुरम्य परिसराजवळच

पाच सहा मैलाच्या अंतरावर सुलभोजन शिखराच्या सपाटीवर शिवमंदिरे आहेत. तेथेच सूर्यकुंड नावाचे एक तळे आहे. याच भागात सहस्त्रलिंग म्हणूनही एक स्थान आहे. दाट झाडी आणि एकान्त यामुळे जनार्दनपंत दत्तध्यानासाठी येथे येत असत. अनेकांना या स्थानात साक्षात्कार झालेले आहेत. याच ठिकाणी जनार्दन स्वामींना दत्ताचा साक्षात्कार झाला होता. दत्तावधूताने कलीयुगातील पहिला शिष्य जनार्दन केला असे नाथांनीच म्हटले आहे. जनार्दन स्वामीवर प्रत्यक्ष दत्तात्रेयांचा अनुग्रह असल्याने आणि नित्य ध्यानधारणेत त्यांचे दत्तात्रेयांशी हितगुज घडत असल्यामुळे पुढे त्यांनी आपले सत्‌शिष्य संत एकनाथ महाराज यांनाही याच ठिकाणी दत्तदर्शन घडविले होते. जनार्दन स्वामींनी नाथांच्या बरोबर नाशिक-त्र्यंबकेश्वरची तीर्थयात्रा केली होती. नाशिकच्या चंद्रबोध या ब्राह्मण सत्पुरुषाशी संबंध आला होता. श्रीगोंदे येथील सुफीपंथी संत आणि सिद्धांतबोध या ग्रंथांचे कर्ते शेख महंमद हे याच चंद्रबोधाचे शिष्य होते.

जनार्दन स्वामी हे निस्सिम दत्तभक्त होते. दत्तसंप्रदायी होते हे खरे असले तरी त्याच्या वाङ्मयात, स्फूट रचनेत कृष्णभक्तीलाही स्थान असल्याचे आढळून येते. जनार्दन स्वामींनी राजकारण परमार्थ आणि प्रपंचयोग ही त्रयी योग्यरीतीने सांभाळून १४९७ च्या फाल्गुन वद्य ६ रोजी आपला अवतार संपवला. त्यांचा जन्म, त्यांना दत्तदर्शन, नाथांना बोधदान आणि समाधियोग यांचा दिवस फाल्गुन वद्य ६ हाच आहे. आणखी नवलाची गोष्ट म्हणजे जनार्दन स्वामीचे पट्टशिष्य ज्यांना महाराष्ट्र अनथांचा नाथ म्हणून ओळखते त्या संत एकनाथाचा समाधीचा दिवसही फाल्गुन वद्य षष्ठी हाच आहे.

जनार्दन स्वामींच्या काही स्फूट रचनाही आहेत. 'आत्मनात्मविवेकसार' नावाचा एक ओवीवृत्तात्मक ग्रंथ त्यांनी पंचीकरणावर लिहिलेला आहे. तसेच उपनिषदवेदान्त भावगीता त्यांनी रचली असल्याचे कन्नडकर वि. बा. जोशी आपल्या 'श्रीसंत-जनार्दन स्वामी' या चरित्र ग्रंथात नमुद करतात. जनी जनार्दन, रामा जनार्दन, एका जनार्दन अशा काही शिष्यांचा परिवार त्यांच्या भोवती नित्य असे. पैठण, देवगिरी, काशी इत्यादी ठिकाणी जनार्दन स्वामींचे संबंध आहेत. नाथांनी काशीत ब्रह्मघाटापाशी जनार्दन मठाची स्थापना केली. देवगिरी दौलताबाद, मानपुरी मठात, बीड पटांगणत मठात, परभणी जिल्ह्यातील चाराठाणा येथील मठात, नाशिकच्या तपोवनातील मठात, जनार्दन स्वामींच्या मठाची परंपरा चालू आहे. उमरखेड, औरंगाबाद, कमळनूरी तालुक्यातील दत्तोपासनेच्या परंपरा चालू आहेत. संत जनार्दन स्वामींची समाधी ही देवगिरीलाच आहे असे संशोधकांचे मत आहे.


अशा रितीने जनार्दन स्वामी पासून महाराष्ट्रात दत्तोपासनेची एक शाखा समृध्द झालेली दिसेल. एकनाथांनी दत्तभक्ती विठ्ठल भक्तीत मुरवून टाकली असली तरी जनार्दन स्वामींच्या कृपेने जागृत झालेला दत्तभक्तीचा धागा अतुट होता. **''धन्य गुरू जनार्दन । स्वानंदाचे जे निधान''** असे नाथांनी या साठीच म्हटले आहे. आपणास ज्ञानबोध दत्तात्रेय - जनार्दन यांच्याकडूनच मिळाल्याची ग्वाही देताना एकनाथांनी म्हटले आहे. **'जनार्दनाचा गुरु । स्वामी दत्तात्रय दातारु ॥ त्यांनी उपकार केला । स्वानंदाचा बोध दिला ॥ सच्चित्सुखाचा अनुभवा दाखवला स्वयमेव । एका जनार्दनी दत्त । वसे माझ्या हृदयात ॥**

## संत एकनाथ

पंधराव्या शतकातील वारकरी संप्रदायाचे महान संत पैठणचे एकनाथ हे जनार्दन स्वामींचे पट्टशिष्य म्हणून सर्वत्र विख्यात आहेत. भागवत धर्माच्या कलत्या इमारतीस खांब देऊन ती सावरणारे एक थोर संतपुरुष म्हणून त्यांना संबंध महाराष्ट्रभर ओळखलं जातं. संत एकनाथाच्या उपलब्ध वाङमय साहित्यावरुन ते विठ्ठलाचे भक्त होते असे आढळून येते. मात्र मुलत: ते दत्त संप्रदायी होते. जनार्दन स्वामी त्यांचे गुरु होते आणि त्यांनी त्यांना दत्तदर्शनही घडविलं होते. तद्‌नंतर मात्र त्यांनी प्रसार केला तो वारकरी संप्रदायाचा विठ्ठल भक्तीचा, अर्थात त्यांनी धर्मकार्यासाठी, भक्तीप्रेमाची समाजाच्या तळागाळात वाढ करण्यासाठी हा जो विठ्ठल भक्तीचा धागा घट्ट धरला तो त्या काळात, परिस्थितीला धरुन अनुरुप असाच होता असे म्हणावे लागेल. त्यांनी रचलेले एकनाथी **भागवत** आणि **भावार्थरामायण** या दोन महान ग्रंथानी वारकरी संप्रदायात त्यांना अजरामर करुन टाकले. वारकरी संप्रदाय त्यांना डोक्यावर घेऊन नाचू लागला. या ग्रंथरचने खेरीज विपुल अशी अभंग आणि भारुड रचनाही नाथांनी केली आणि सामान्यातल्या सामान्य लोकांपर्यत विठ्ठलाची प्रेमभक्ती नेऊन रुजवली.

नाथांनी राहणी उच्च दर्जाच्या गृहस्थाश्रमी व्यक्तीची होती. त्याची सांपत्तिक स्थितीही उत्तम होती. तरीही त्यांची मैत्री मात्र समाजातल्या तळागाळातल्या लोकांपर्यंत होती. परमार्थाला या गोष्टीची बाधा कधीही होत नाही हे नाथांनी आपल्या उदाहरणाने साऱ्या जगाला दाखवून दिले आहे. म्हणून तर

मानवी समतेचा पुरस्कार केवळ तात्विक ग्रंथातच नव्हे तर प्रत्यक्ष आचरणातही करुन दाखविणारे एकनाथ हे पहिले कर्ते समाज सुधारक होते असचं म्हणावं लागेल. त्यांच्या वारकरी पंथाच्या विठ्ठल भक्तीतही दत्तभक्तीचा, दत्तप्रेमाचा एक बळकट धागा मोठ्यासमरसतेने विणला गेला असल्याचे त्यांच्या वाङमयातील **'दत्तनाम महिमा' 'दत्तमानस पूजा' 'दत्त जन्म'** अशा काही छोट्या प्रकरणावरून स्पष्ट होते.



नाथांचे पणजे भानुदास हे एक मोठे सत्पुरुष म्हणून गणले गेले आहेत. पैठणच्या या घराण्यात विठ्ठलाची उपासना होती. यांचेही काही अभंग आज उपलब्ध आहेत. यांनीच पंढरपूर येथील विठ्ठल मूर्ती अनागोंदीहून परत पंढरपुरास आणली. या भानुदासांचा मुलगा चक्रपाणी. चक्रपाणीचा मुलगा सूर्यनारायण या सूर्यनारायणाच्या पोटी शके १४५५ मध्ये एकनाथांचा जन्म झाला. एकनाथ मुळ नक्षत्रावर जन्मले म्हणून की काय, थोड्याच दिवसात त्यांच्या आई-वडिलांचे निधन झाले. एकनाथ पोरके झाले. पुढे त्यांचे आजोबा चक्रपाणी यांनी नातवाचा चांगला सांभाळ केला. नाथांना लहानपणापासूनच स्नानसंध्येची, हरिभजनाची, पुराण श्रवणाची, व नामस्मरणाची आवड होती. थोडे वय होताच एकनाथ देवागिरीवर जनार्दन स्वामींच्या सहवासात आले. देवागिरीवर मुसलमानी सत्तेत राहूनही जनार्दन स्वामी दत्तभक्तीचा प्रसार करीत. एकनाथांनी जनार्दन स्वामींची हरप्रकारे सेवा करुन त्यांची कृपा संपादन केली. यांच्याच कृपेने नाथांना देवगिरी जवळील एका निसर्गरम्य अशा एकान्तस्थळी मलंगवेषात दर्शन दिले. सर्वांग चर्मानि वेष्ठिलेले बरोबर कुत्रीच्या रुपात कामधेनू, डोळे अनासक्त झालेले. असे हे दत्तरुप एकनाथांनी ओळखले. दत्ताच्या आज्ञेवरुन जनार्दन स्वामींनी त्या कामधेनुचे दूध काढले, झोळीतून शिळ्या भाकरीचे तुकडे काढून त्यात कालवले आणि उभयतांनी यथेच्छ भोजन केले. भोजनानंतर ते मृण्मय पात्र एकनाथांना विसळण्यासाठी दिले. नाथांनी ते विसळताना हाच आपला प्रसाद म्हणून त्यातील जल सेवन केले. **''श्रीगुरुंचे उशिटे। लाहे जे अवचटे। ते तेणे लाभे विटे। समाधीसी''** या ज्ञानेश्वरांच्या भावनेने नाथांनी तो प्रसाद म्हणून धारण केला. नाथांची ही निष्ठा पाहून दत्तात्रेयांनी आपल्या खऱ्या रुपात प्रकट दर्शन देऊन नाथांना कृतार्थ केले. दत्त व जनार्दन स्वामी एकरुप असल्याची खात्री नाथांची झाली.

या नंतर एकनाथांच्या दत्तभक्तीस चांगलाच बहर आला. 'भरला ओतप्रोत स्वामी माझा देवदत्त ।' दससबाह्य अभ्यंतरी। दत्तात्रेय चराचरी'अशी त्यांची वृत्ती बनून गेली. आपल्या ग्रंथातून नाथ या दत्तकृपेचा मोठ्या आदराने, श्रद्धेने उल्लेख करताना दिसतात. भागवताच्या आरंभीच नाथांनी म्हटले आहे. **'आता नमू दत्तात्रया। जो आचार्याचा। तेणे प्रवतीविले ग्रंथ कार्या। अर्थवाक्या निज बोधू॥** तसेच 'भिक्षूगीते' च्या अखेरीस नाथ म्हणतात.

**'माझे निजगुरुंचाही' गुरु। श्री दत्तपरमगुरु।** तो भिक्षुगीतार्थेसाचारू । योग्या योगेश्वर तुष्टला ॥ या दत्तात्रेयांनी एकदा त्यांना काशीक्षेत्रीही दर्शन दिले होते. त्यानंतर नाथांना वारंवार दत्तदर्शन होत राहीले. नाथांनी स्मरण करावे आणि दत्तांनी प्रगट व्हावे असे नाते जडले. देवगिरी जवळील शूलभंजन वा सूर्यपर्वतावरील सूर्यकुंडानजीकच्या एकान्तात ध्यानधारणा करुन नाथांनी दत्तात्रेयांना प्रसन्न करुन घेतले होते. दत्ताच्या सगुण दर्शनामुळे त्यांना दत्ताचे व्यापक रुपही ध्यानात आले. भागवताच्या एकादश स्कंधाच्या सात, आठ, व नऊ या अध्यायात दत्तवधूतांनी आपल्या चोवीस गुरुंचे केलेले वर्णन नाथांनी आणखीच रसाळपणे सांगितले आहे. या अवधूत संवादातील अवधूत म्हणजे दत्तच असे नाथ म्हणतात. **'तो अवधूत जाण दत्तात्रेया'** असे नाथांचे या संदर्भात वचन आहे. नाथांची दत्तभक्ती किती गाढ होती व दत्ताची नाथावर केव्हढी प्रीती होती हे समकालीन दत्त भक्त श्री दासोपंत यांनी एका प्रसंगी सांगितले आहे. ते म्हणतात **'दत्तात्रय धरुनीदारा रक्षी होऊनी चोपदार ।** नाथांच्या दारावर दत्तात्रेय चोपदार बनू त्यांचे रक्षण करतात अशी दासोपंतांची साक्ष आहे. एकनाथ हे असे महान दत्तभक्त होते.

## दासोपंत

बिदरच्या बहामनीशाहीतील नारायणपेठ नावाच्या गावी दिगंबरपंत देशपांडे यांच्या घरी भाद्रपद व. ८ शके १४७३ रोजी दासोपंतांचा जन्म झाला. घराण्यात चांगली श्रीमंती नांदत

होती. याच वेळी प्रांतात मोठा दुष्काळ पडला म्हणून दिगंबर पंतांनी आपल्या अधिकारात सरकारी गुदामातील धान्य भुकेलेल्यांना वाटून टाकले. या धान्याच्या रकमेची भरपाई वेळेवर सरकारी खजिन्यात झाली नाही. यामुळे बादशहा नाराज झाला. बादशहाने दासोपंतास ओलिस ठेवून दिगंबर पंतांस बजावले की एक महिन्याच्या आत बाकी चुकती झाली नाही तर पोरास मुसलमानी दिक्षा देऊ.' दिगंबरपंत व दासोपंत या दोघांनी दत्तप्रभूंची करुणा भाकली आणि किमया घडली. दत्ताजी पाडेवार नावाच्या एका दत्तस्वरुप विभूतीने रक्कम सरकारात भरुन दासोपंताची सुटका केली. दासोपंत मुक्त झाल्यामुळे सर्वांना आनंद वाटला, तरी खुद्द दासोपंतांची चित्रवृत्ती मात्र वैराग्याने उजळून निघाली होती. त्यांना अस्वस्थता वाटत राहीली. ज्या दत्तप्रभूने आपणास वाचविले त्याचा शोध घेण्यासाठी एकाएकी ते घरातून निघून बाहेर पडले.

हिलालपूर, डाकुळगी, प्रेमपूर, नांदेडवरुन ते मातापूर तथा माहूर या क्षेत्री आले. तेथील निसर्गरम्य परिसर, रेणूका मातेचे दर्शन, दत्त अनसुयेचे दर्शन, मातृतिर्थावर स्नान इत्यादित त्यांचे मन रमले. ध्यानधारणेस अतिशय अनुकुल अशा या ठीकाणी दासोपंतांनी दत्तभक्तीचा अनुभव घेतला. माहूर येथे एक तप ते दत्तभक्तीत रमून गेले होते. त्यानंतर ते पुन्हा संचारास निघाले. राक्षसभुवन येथील गोदामाईच्या वाळवंटात त्यांना दत्त पादुकांचा प्रसाद मिळाला. येथेच त्यांना एकान्त वासात अवधूतचे दर्शन झाले. त्यानंतर पुन्हा ते डाकुळगीस आले. कृष्णाजीपंतास तेथे त्यांनी एक दत्तमूर्ती नित्याच्या उपासनेसाठी देऊन ते वाणीसंगमी आले; येथेच त्यांना त्यांचा घरचा परिवार भेटला. बारा वर्षे पतीचा पत्ता नसल्यामुळे त्या काळच्या लौकीक प्रथे प्रमाणे सौभाग्य चिन्हांचा विधीपूर्वक त्याग करण्यासाठी दासोपंताची पत्नी आपल्या घरच्या लोकांसमवेत येथेच आली होती. अशा या नाट्यपूर्णप्रसंगात सर्वांचे मिलन झाले. वाघेश्वराच्या मंदिरात दासोपंत आपल्या आई-वडिलांना आणि पत्नीला भेटले. सर्वांना अतिशय आनंद झाला. त्यानंतर दासोपंतानी नारायण पेठ येथील आपल्या वतनाचे दानपत्र करुन ते कायमचे राहण्यासाठी म्हणून अंबेजोगाईस येऊन स्थायिक झाले.

सितोपंत देशपांडे यांनी त्यांचे शिष्यत्व पत्करुन अंबेजोगाईस दासोपंताची सर्वव्यवस्था उत्तम प्रकारे लावून दिली. या ठिकाणी दासोपंतानी अखंडपणे लेखन करुन मराठी शारदेस उत्कृष्ट नजराणे समर्पित केले. 'गीतार्णन' नावाचा त्यांचा ग्रंथ सव्वा लाख ओव्यांचा आहे. ग्रंथराज, वाक्यवृत्ती, पंचीकरण, पदार्णव, अनुगीता, महापूजा, वज्रपंजरकवच, अशी त्यांची लहानमोठ्या प्रमाणावरची रचना विपुल आहे. दत्तात्रेयांचा माहिमा तर त्यांनी अनेक पदांपासून गायिला आहे. दसोपंताच्या दत्तोपासनेची पध्दतही वैशिष्ट्यपूर्ण आहे. दासोपंताच्या परंपरेत दत्तात्रेयांचे सोळा अवतार प्रसिद्ध असून सतरावा म्हणजे स्वतः दासोपंत म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचा उल्लेख 'श्री सर्वज्ञावतार' म्हणून हातो. उपासनेची त्यांनी ठरवून दिलेली पद्धत अजूनपर्यंत या परंपरेतून चालू आहे. प्रत्येक दिवशीची उपासनाविधी, सातवारांची वेगवेगळी भजने, पर्वकाळाची आणि उत्सवाची विशेष भजने, पदे, आरत्या, शेजारत्या, अष्टके, स्तोत्रे हे सर्व त्यांनी आखून व रचून ठेवले आहे. विशिष्ट प्रसंगी करावयाची लळीते, संगीत, टिपऱ्या यांचीही रचना केलेली आहे. नित्यासाठी दशनाम, शतनाम, सहस्त्रनाम, स्तवराज, माहात्म्ये ही सुद्धा तयार करून दिलेली आहेत. उत्सवपद्धती, सेवा, अर्चन, उत्तरार्चन याची देखील शिस्त त्यांनी घातलेली आहे. मूर्तीच्या नित्य स्नानासाठीही काही नियम आहेत. **''आनंदे दत्तात्रेय देवदेव''** हा दासोपंत परंपरेतील जयघोष आहे.

दासोपंतांनी वरीलप्रमाणे दत्तोपासना दृढ चालावी म्हणून दत्तात्रेयावर अनेक प्रकारची स्फूट व प्रकरणात्मक रचना केली आहे. अंवधूतराज, दत्तात्रेय महात्म्या (संस्कृत) अवधूत गीता, दत्तात्रेय सहस्त्रनामघोषस्तोत्र, दत्तात्रेय दशनामस्तोत्र, दत्तात्रेय षोडशनाम स्तोत्र, शतनामस्तोत्र, द्वादशनाम स्तोत्र, सिद्धदत्तात्रेय स्तोत्र, गुरुस्तोत्र, दत्तात्रेय नामावली, षोडशअवतारध्यानस्तोत्र इत्यादी प्रकरणे दासोपंताच्या परंपरेत नित्य म्हटली जातात. दासोपंतांची दत्तात्रेयावरील पदे अतिशयनादमधुर व भक्तिरसपूर्ण आहेत. दत्तांविषयी दासोपंतावर वाटणारी करुणा, आशा, भक्ती यांचे मूर्तीमंत दर्शन दासोपंताच्या पदातून व्यक्त होते. 'तुम्ही जा, जावो झडकरूनी त्यासी येई जा घेऊनी'' चालता बोलता तुझे रुप ध्याईन, बोलविता न बोलसी ऐसे म्या वो काय केले? जपुतपू तीर्थाटण माझे हेचि ब्रह्मज्ञान' इत्यादी ओळीतून दासोपंताच्या हृदयातील आर्तता जाणवण्यासारखी आहे. दासोपंताच्या पासोडीत याहून अधिक बरच काही भरलं आहे. परंतु सर्वच काही लिहिता येणं शक्य नाही खरं ना. या तीन संतांची, त्यांच्या साहित्याची, परंपरेची थोडक्यात ओळख करून दिली. जिज्ञासूंनी आता अधिक खोलात शिरून त्यांच्या साहित्याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करावा हीच ईच्छा आणि या लेखनामागचा उद्देश आहे.

ooo

# साई वंदना



## साई आले घरा

साई आले घरा
तोचि मज दिपावली दसरा
मनात जरी या सदैव चिंतन
ठाऊक नव्हते देतील दर्शन
करतील इतुकी त्वरा
साई आले घरा
वात्सल्याचा गंध दरवळे
नयनांमधुनी नित्य झुळझुळे
शांतिसुखाचा झरा
साई आले घरा
आर्त साद ती पडता कानि
प्रतिसादास्तव आले धावुनि
अुद्धरण्या पामरा
साई आले घरा...
आनंदाच्या अुजळून ज्योती
श्रीसाईंची करू आरती
नामघोष तो करा
साई आले घरा...

**प्रसाद कुलकर्णी**

## श्री साईस्तवन

हरि ओम हरी ओम हरी ओम
नमोस्तुभ्यं साईनाथम्
नमामि त्वम्, पदारविंदम्
करोमि त्वम्, चरणस्पर्शम्
आशीर्वादं साईनाथम्
ओम नमो श्री साईनाथम्

## साईनाम

साई नामाचा लागला छंद
जीवन होई सदा धुंद ॥धृ॥

तुझ्या नामातील ओंकार
करितसे पाप संहार ॥१॥

वाचे उच्चारता साईश्री
दारी उभी असे भाग्यश्री ॥२॥

म्हणताच तुजला साई
करुणामय दिसते आई ॥३॥

साईशी म्हणता नाथ
दिसतसे वैकुंठनाथ ॥४॥

हरी ओम श्री साईराम
अंतरांत वसे श्रीराम ॥५॥

**चंद्रकांत र. थिगळे**
अहमदनगर.

# चला जावू शिरडी नगरी

''चला जावू शिरडी नगरी।
श्री साईनाथाच्या दरबारी।''
वर्षा-वर्षांनी शिरडीत यावे।
श्री साईनाथाचे दर्शन घ्यावे ॥१॥

तुम्ही ध्याल हार-फुले।
तुम्ही ध्याल नारळ-पेढे।
तुम्ही ध्याल शाल जरिची।
तुम्ही ध्याल शाल फुलांची ॥२॥

श्री साईस हे नको सारे।
श्रध्देने शिरडीस यारे।
निष्ठा ठेवूनी श्री साई चरणी।
शरण तुम्ही श्री साईस यारे ॥३॥

मस्तक ठेवा समाधीवरी।
दुःखहि जाई पळूनी दूरी।
आनंदी-आनंद होईल।
होईल रे मनोकामना पूरी ॥४॥

निरोप घेता श्री साईचा।
अश्रु येतील भरूणी नयनी।
कंठहि दाटून येईल।
मन हे मागे वळूनी पाही ॥५॥

श्रद्धा-सबुरी उपदेश श्री साईचा।
मनी आठवा सदा-सर्वदा।
जपा मंत्र श्री साईचा।
ॐ श्री साई समर्थ, ॐ श्री साई समर्थ ॥६॥

**श्री. अविनाश पाध्ये**
बोरिवली (प.), मुंबई.



## ॥ साईज्योत ॥

शिरडी गावी प्रकटली एकतारुपी साईज्योत
ती जनांच्या मनी हळू हळू पेटवी एकताज्योत भावनांची
भिक्षेंच्या निमित्ताने फिरे ही ज्योत दारोदारी व
देई जनांना दिक्षा समानतेची वारंवारी ॥१॥

साईज्योतीत कधी दिसे अल्ला तर कधी दिसे विष्णू
तर कधी येशू तर कधी वाहे गुरू
साई ज्योत आपल्या सुमंगल एकता प्रकाशाने
उजळून टाकी भक्तजनांचे मन आणि
प्रेरीत करी समभावाचे नाते परोपरी ॥२॥

साईज्योत आपल्या एकता बाणाने
तोडी जाती-भेदाची भिंत व जोडी नाते समानतेचे
या मंगल नात्याने नांदी सर्वत्र राम-रहीम
व प्रज्वलित करी साईज्योत भाईचाराने ॥३॥

साई म्हणे येथे दुजा नाही कोणी
हम सब एक है
हम सबका मालिक एक है
अशा या साईंच्या शब्दरुपी तेलाने
सदैव तेवत राही ही एकता ज्योत
साई भक्तांच्या मनी ॥४॥

**अनिल महादेव कापकर**
माहिम, मुंबई.

# साई प्रचारक




— ❖ ❖ ❖ —

**'श्री साईलीला' मधील आमच्या आवाहनास मान देऊन पुढील साईभक्तांनी पाच नवे वर्गणीदार आम्हास मिळवून दिले व साईविचार प्रसाराच्या कार्यात सक्रिय भाग घेतला त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. सर्व साईभक्तांनी या सक्रिय साईभक्तांच्या सेवेचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून श्री साईलीला अवघ्या महाराष्ट्रात घरोघर जाण्याच्या दृष्टिने नवे नवे वर्गणीदार करून सहकार्य करावे ही विनंती.**

— ❖ ❖ ❖ —

श्री. संदीप मल्लिकार्जुन अंकलकोटे, लातूर
श्री. यशवंत रा. आजरकर, गोवा
श्री. जी. के. कोठावळे, कोल्हापूर
श्रीमती प्रतिभा शरद सापळे, मुंबई
श्री. राजेंद्र बी. पराखडे, वर्धा
श्री. कमलाकर शामराव वणीकर, पुणे
श्री. उदय आत्माराम केळसकर, मुंबई
श्री. सुधाकर रघुनाथ सुर्वे, मुंबई
श्री. शामराव रंगराव पवार, पुणे
श्री. गुरुदास डी. कामत, गोवा
श्री. नारायण पुरुषोत्तम मेहता, महाड (१६ सभासद)
श्री. गं. गो. गुंगेवार, देगलूर (७ सभासद)
श्री. बापू नाथा साबळे, मुंबई
श्री. भालचंद्र केशव गंद्रे, ठाणे
श्री. श्रीराम पन्नालाल वाणी, जालना
श्री. मनोहर वामन सातपुते, इचलकरंजी
सौ. विजया केशव प्रभूदेसाई, जामखेड
श्री. आत्माराम सुका पाटील, जळगाव
श्री. मधुकर भगवंतराव मलमकर, निंभोरा
सौ. आशा अरविंद सोनटक्के, मुंबई
प्रा. तु. ग. माने, वर्धा

स्नेहीता एस. नाईक, गोवा
सौ. निला अतुल त्रिवेदी, मुंबई
श्री. कृष्णा उकंडराव पाचघरे, नागपूर
श्री. रमाकांत सहदेव सावंत, लांजा (१० सभासद)
सौ. रविना एम. दरयानी, मुंबई
श्री. अे. जी. कुलकर्णी, मुंबई
श्री. राम लखन दुबे, रांची
श्री. विनोदुकुमार केले, नाहन
अंजू माटू रैना, न्यू दिल्ली
विंग कमांडर अे. के. गडकरी, पुणे (८ सभासद)
श्री. जनकराज लारोईया, यू. पी. (७ सभासद)
श्री. सुधाकर रघुनाथ सुर्वे, मुंबई
श्रीमती प्रतिभा शरद सापळे, मुंबई
श्रीमती शालनबाई मुरलीधरराव कौरवार, देगाहूर
श्री. विश्वास दिनकर कर्णीक, डोंबिवली (प.)
श्री. पांडुरंग हरीभाऊ धुले, पुणे
श्री. सुनील ब. देशमुख, वर्धा
श्री. विश्वनाथ श्रीधर वरुणकर, मुंबई
श्री. आर. बी. जुन्नरकर, वडोदरा
श्री. मनोहर अनंत सावंत, रत्नागिरी
श्री. अशोक दिगंबरराव मेडपल्लीवार, राजुरा

# अभिप्राय




## सर्व अंक सुंदर

स.न.वि.वि.

जानेवारी ९६ ते डिसेंबर ९६ पर्यंतचे सर्व अंक वेळेवर प्राप्त झाले. मनस्वी आनंद झाला. सर्वच अंक सुंदर व वाचनीय आहेत. संग्राह्य आहेत. या पुढील अंकही असेच नियमित मिळावेत.

**बी. एच. जोशी**
मॅनेजर, सिंडीकेंट बँक, शाखा अहमदनगर.

## नवचैतन्य निर्माण करणारा अंक

स.न.वि.वि.

श्रीसाईलीला चा जाने-फेब्रुवारी ९७ चा अंक प्रतिक्षा करीत असतानाच अगदी वेळेवर हाती आला. खूपच समाधान वाटले 'ज्ञानोबा माझा' व सकल संत गौरव लेख खूप आवडले. रानडे यांचा लेख अतिशय आवडला. एकूण अंक नवचैतन्य निर्माण करणारा वाटला.

**प्रमोद उत्तमराव गावंडे**
राजना, अमरावती

## 'विष्णुसहस्त्रनाम' लेख आवडला

स.न.वि.वि.

मार्च-एप्रिल ९७ च्या अंकातील 'सामर्थ्य संपन्न प्राचीन स्तोत्र विष्णुसहस्त्रनाम' हा लेख वाचून खूपच आनंद झाला. मला 'विष्णुसहस्त्रनाम' स्तोत्र कुठे मिळेल ? आपण पाठवाल का ?

**मंगेश नांदगावकर**
रोहिदासनगर, श्रीवर्धन (रायगड)

## सकल संतांच्या माहितीचा लाभ

स.न.वि.वि.

श्री साईलीला चा अंक आम्हास खूप आवडतो. श्रीसाईबाबाबद्दल अंकातून खूप नवी नवी माहिती मिळते. तसेच बाबा व इतर साधूसंताचे मोठेपण कळून येते. संतांमध्ये भेदाभेद न करता समाजकल्याण करणाऱ्या सर्व संतांची आपण माहिती देता हे पाहून आनंद वाटतो. मनात सदभावनेची ज्योत प्रज्वलित होते.

**अरुण जाधव**
ठाणे

## सत्प्रवृत्ती निर्माण करणारा अंक

श्री साईलीला आम्हास फारच उपयुक्त वाटतो. आमच्या कुटुंबातील सर्वजण तो वाचतात. तो वाचून मनुष्यात सत्प्रवृत्ती निर्माण होते. अलिकडे सर्व अंक खूपच उत्तम निघालेत. आपण या मासिकाचे सभासद आहोत याचा आम्हास अभिमान वाटतो. आम्ही आमच्याकडे येणाऱ्या सर्वांना ते दाखवून वर्गणीदार व्हावे असा आग्रह करतो.

**शंकर पल्लेवार**
नांदेड

## जे चांगले त्याला चांगले म्हणतो

जी वस्तू चांगली आहे तिला चांगलीच म्हणावी लागते. त्याप्रमाणे श्रीसाईलीलाचे अंक सर्वांगसुंदर झालेले आहेत. विशेषतः पुण्यतिथी अंक फारच सुंदर होता. श्रीसाईबाबा ही आपणा सर्वांची 'निजवस्तू' आहे अशा बाबांचा कृपाशिर्वाद आपल्या प्रत्येक अंकामागे आहे. विशेषांकांची बैठक 'दैवी-प्रेम' असल्याने सर्वच विचार दैवीप्रेमाने युक्त आहे. हेच येथील 'सत्य' होय. ही जाणीव ठेवून अंक वाचल्यास सहजपणे मनःशांती लाभते आपल्या संपादकीयातून आपणावर झालेल्या श्रीसाईबाबांच्या कृपेची खात्री पटते.

**शाम जुवळे,**
मुंबई

## दर्जेदार एवम् बोधप्रद

श्रीसाईलीला या 'श्री पुण्यातिथी विशेषांक' खरोखरीच अती उत्तम निघाला आहे. त्यात प्रकाशित लेख अती उच्च दर्जेदार एवं बोधप्रद असल्यामुळे साईभक्तांना प्रेरणादायी ठरतील. मी 'श्रीसाईलीला'चा नियमित लेखक आहे मध्यंतरी काही कारणाने मी लेखन बंद केले होते आता पुन्हा सुरू करण्यास वरील अंकांने प्रेरणा मिळाली आहे.

**राधाकृष्ण गुप्ता,**
डोंबिवली

## वेळेवर अंक मिळतात

स.न.वि.वि.

'श्री साईलीला'चे अंक गेले वर्षभर वेळेवर मिळाले. सर्व एकापेक्षा एक वाचनीय व सुंदर आहेत. श्रीसाईलीलाची ही उत्तरोत्तर प्रगती पाहून मनस्वी आनंद वाटतो. मनःपूर्वक अभिनंदन !

**जे. एस. लक्कड**
निवृत्त उप सचिव म. प्र. सरकार, भोपाळ

### श्रद्धांजली

**साईभक्त सौ. उषा वसंत कारखानीस**
**श्री साईचरणी विलीन**



श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे विश्वस्त श्री. प्रकाश वसंत कारखानीस यांच्या मातोश्री सौ. उषा वसंत कारखानीस या सोमवार, दिनांक १९ मे, १९९७ रोजी श्री साईचरणी विलीन झाल्या. मृत्युसमयी त्यांचे वय ७८ वर्षे होते. त्यांनी त्यांचे आत्मबल अखंड श्री साईचिंतन-मननाने इतके विकसित केले होते की, निरीक्षण, श्रवण, वाचन, लेखन, संभाषण, आठवण, आचरण या सर्व क्रिया त्यांच्या देहांतापर्यंत सतत कार्यशील होत्या.

साईभक्तीची ओढ त्यांना माहेरी बालपणीच लागली, व साईभाग्याने, दुग्धशर्करायोगाने सासरही त्यांना साईभक्तीने भारलेलं लाभलं. प्रसन्न व्यक्तिमत्वाने व प्रेमळ स्वभावाने त्यांनी त्यांच्या संपर्कात आलेल्या साऱ्यांना आपलंसं केलं. आर्तजनांना साईमहिमा, साईशिकवण ऐकवून त्यांना साईभक्तीकडे वळविले व त्यांचा जीवनमार्ग सुकर केला.

त्यांच्या आत्म्यास शांती लाभो, ही श्री साईचरणी प्रार्थना.

**- संपादकीय विभाग 'श्री साईलीला'**

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्रमांक | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत | पॅकिंग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ४८.०० | १२.०० |
| २. | श्री साई सत्चरित | इंग्रजी | १८.५० | १०.०० |
| ३. | श्री साई सत्चरित | हिंदी | २४.०० | १०.०० |
| ४. | श्री साई सत्चरित | गुजराथी | २३.०० | १०.०० |
| ५. | श्री साई सत्चरित | कन्नड | २२.०० | १०.०० |
| ६. | श्री साई सत्चरित | तेलुगु | २७.०० | १०.०० |
| ७. | श्री साई सत्चरित | तामीळ | २७.०० | १०.०० |
| ८. | श्री साई सत्चरित | सिंधी | २२.०० | १०.०० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१.०० | १२.०० |
| १०. | श्री साईलीलामृत | मराठी | ९.५० | १०.०० |
| ११. | श्री साईलीलामृत | हिंदी | १२.५० | १०.०० |
| १२. | श्री साईलीलामृत | गुजराथी | ६.६५ | ८.०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६.८० | ८.०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | १.०० | ८.०० |
| १५. | स्तवन मंजिरी | हिंदी | १.१५ | ८.०० |
| १६. | स्तवन मंजिरी | गुजराथी | १.३० | ८.०० |
| १७. | स्तवन मंजिरी | इंग्रजी | २.०० | ८.०० |
| १८. | सगुणोपासना (आरती) | मराठी | १.२५ | ८.०० |
| १९. | सगुणोपासना (आरती) | हिंदी | १.५० | ८.०० |
| २०. | सगुणोपासना (आरती) | गुजराथी | १.१० | ८.०० |
| २१. | सगुणोपासना (आरती) | तेलुगु | ४.६० | ८.०० |
| २२. | सगुणोपासना (आरती) | सिंधी | - | ८.०० |
| २३. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | ३.०० | ८.०० |
| २४. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | - | ८.०० |
| २५. | मुलांचे साईबाबा | मराठी | २.०० | ८.०० |
| २६. | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | २.६० | ८.०० |
| २७. | मुलांचे साईबाबा | हिंदी | २.०० | ८.०० |
| २८. | मुलांचे साईबाबा | गुजराथी | १.७५ | ८.०० |
| २९. | मुलांचे साईबाबा | तेलुगु | - | ८.०० |
| ३०. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १.१५ | ८.०० |
| ३१. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६.७० | ८.०० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिरडी (भरुचा) | इंग्रजी | - | ८.०० |
| ३३. | साईबाबा ऑफ शिरडी (प्रधान) | इंग्रजी | ३.५० | ८.०० |
| ३४. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | - | १०.०० |
| ३५. | खापर्डे डायरी | इंग्रजी | ११.०० | १०.०० |

# साईभक्तांना आवाहन

प्रिय साईभक्तांनो !
सप्रेम नमस्कार,

आपण 'श्री साईलीला'चे वाचक आणि वर्गणीदार आहात. 'श्री साईलीला'चे नवे स्वरूप आपण सर्वांनाच आवडले आहे. आपणापैकी तशी पत्रे आम्हाला पाठविली आहेत. त्याबद्दल धन्यवाद !

श्री साईबाबांचे कार्य, त्यांची शिकवण, भक्तांना आलेले त्यांचे अनुभव आणि अध्यात्माचा प्रसार अधिकाधिक लोकांत करणे म्हणजेच साईसेवा आहे. त्यासाठी 'श्री साईलीला' सर्वाधिक लोकांपर्यंत पोहोचावयास हवा. या साईसेवेत आपण वाढ करू शकता !

आपण फक्त पाच वर्गणीदार 'श्री साईलीला'स मिळवून द्यायचे. यामुळे आपल्या हातूनही साईसेवा घडेल आणि श्री साईबाबा आपल्यावर कृपा करतील याची आपणासही कल्पना आहेच.

तरी खालील फॉर्मवर पाच वर्गणीदारांचे पत्ते व प्रत्येकी ५० रु. प्रमाणे एकूण २५० रु. पाठवावे.

कळावे. श्री साईबाबांच्या आशीर्वादासह !

आपला स्नेहांकीत,
**विद्याधर ताठे**
कार्यकारी संपादक
'श्री साईलीला'

---------- ✂ ---------- इथे कापा ---------- ✂ ----------

कार्यकारी संपादक
'श्री साईलीला',
८०४-बी, साईनिकेतन,
डॉ. आंबेडकर रोड, दादर (पू.),
मुंबई - ४०० ०१४.

यांस,

आपण साईभक्तांना आवाहन केल्याप्रमाणे सोबतच्या जोडलेल्या कागदावर पाच वर्गणीदारांचे पत्ते पाठवीत असून त्यांची प्रत्येक ५० रु. प्रमाणे रु. २५० (एकूण दोनशेपन्नास मात्र) सोबत मनीऑर्डरने/चेकद्वारा/रोख पाठवीत आहे. त्याचा स्वीकार व्हावा.

श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रसार करण्याची संधी आपण यानिमित्ते मला देऊन साईसेवा करण्यास उद्युक्त केलेत याबद्दल आभारी आहे. कळावे.

आपला,

नाव : ______________________

पत्ता : ______________________

______________________

(ता.क.: सोबतच्या कागदावर पाच नव्या वर्गणीदारांचे पत्ते जोडले आहेत.)



# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## विश्वस्त मंडळ


**श्री. द. म. सुकथनकर**
(अध्यक्ष)

श्री. मोहन मो. जयकर (सदस्य)
श्री. रमेश दा. सोनी "
श्रीमती रेखा ग. दिघे "
श्री. प्रकाश व. कारखानीस "
श्री. मुकेश र. पटेल "
श्री. मधुकर द. जोशी "
श्री. प्रकाश पी. वैशंपायन "
श्री. मधुकर ज. गर्दे पाटील "
श्री. देवकीनंदन सारस्वत "
श्री. आप्पासाहेब खं. कोते "
श्री. रायभान ग. चिने (सदस्य)
श्री. भास्कर शं. बोरावके "
श्री. अण्णासाहेब सा. म्हस्के पाटील "
श्री. राजीव पुं. रोहोम "
श्री. संभाजी कि. काळे "
श्री. अशोक भि. खांबेकर "
सौ. प्रेमाबाई सो. बज "
श्री. रामचंद्र नि. गोसावी "
श्री. प्रभाकर तु. बोरावके "
श्री. सोपान मा. धोर्डे "

# राम नवमी



गोदावरीच्या जलाची कावड घेऊन आलेले साईभक्त



बाबांची तसबीर व पोथीच्या मिरवणुकीचे
गुरुस्थानाजवळील एक दृश्य



उत्सवातील आरतीचे एक दृश्य



श्रीसाईसच्चरिताच्या अखंड पारायणाची समाप्ती
करताना मा. अध्यक्ष श्री. सुकथनकर




उत्सवात साईभक्तांपुढे आपली संगीत सेवा सादर
करताना नाशिकच्या विद्या ओक

**(प्रकाशचित्रे : नितीन मिराणी)**

Registered with the Registrar of News-Papers of India No. MH/527

श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत नियतकालिक

# श्री साईलीला

**अमृत महोत्सवी वर्ष**

संपादक : द. म. सुकथनकर

कार्यकारी संपादक : विद्याधर ताठे

मूल्य ८ रु.

मे – जू

